# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला




आपला मेंदू आपलाच आहे, ह्याची खात्री आहे तुम्हाला?

# या अंकात


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | संपादकीय | | 3-4 |
| 2. | ऱ्होडसचे पतन | श्याम पाखरे | 5-11 |
| 3. | गोष्ट विचारांच्या प्रवासाची | सुकल्प कारंजेकर | 12-17 |
| 4. | आपण विद्यापीठे घडवतो, विश्वविद्यालये नाही ! | नंदा खरे | 18-21 |
| 5. | हिंदूंमध्ये पोप का निर्माण होत नाही ? | रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ | 22-28 |
| 6. | सुरांचा धर्म | संजय संगवई | 29-35 |
| 7. | माहितीपट परीक्षण : | | |
| | *अ पिंच ऑफ स्किन :* ती बोलते तेव्हा | रेखा ठाकूर | 36-39 |
| 8. | अनुभव : कलमा | अमर हबीब | 40-47 |
| 9. | कविता: दुखऱ्या मुळांपर्यंत | द. भा. धामणस्कर | 48 |


**मुखपृष्ठावरील चित्र edufranca.com च्या सौजन्याने**


संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 एप्रिल 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
किरकोळ प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**
रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ ravindrarp@gmail.com
editor.sudharak@gmail.com
भरत मोहनी bharat_i@yahoo.com (9822736808)



ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल अट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-440010. येथे पाठवावे.

# संपादकीय

आज देशभरात सर्वच प्रश्नांवर ध्रुवीकरणाची भूमिका घेतली जाते आहे असे आपल्याला दिसते. तुम्ही एकतर देशप्रेमी आहात किंवा देशद्रोही (देशप्रेमाची व्याख्या आम्ही करू ती!) त्याविरोधात जे आवाज उठत आहेत तेही बव्हंशी प्रतिक्रियेच्या स्वरूपाचे आहेत, किंवा तेही वेगळ्या अर्थाने ध्रुवीकरणाचीच कास धरणारे आहेत. त्यामुळे भारतात एकतर हिंदुराष्ट्राचे समर्थक आहेत किंवा आंबेडकरवाद व मार्क्सवादाच्या समन्वयाचे समर्थक, असे चित्र माध्यमांतून उभे केले जात आहे. मुळात ह्या दोन्ही विचारधारांच्या मध्ये भलाथोरला वैचारिक पैस आहे व भारतातील बहुसंख्य जनता त्या जागेवर उभी आहे. भारतातील आजच्या वैचारिक संघर्षात ह्या 'सुटलेल्या' मधल्या जागेला योग्य स्थान मिळावे, असा आमचा प्रयत्न राहील. अर्थात, 'आजच्या सुधारक'च्या संपादकीय धोरणानुसार रा. स्व. संघापासून माओवादाच्या समर्थकांपर्यंत सर्वांना विमर्शासाठी आमचे विचारपीठ खुले आहे, ह्याचा आम्ही पुनरुच्चार करू इच्छितो.

सामाजिक माध्यमांचा वापर आपापल्या विचारधारांच्या प्रचारप्रसारासाठी कशा पद्धतीने केला जातो, हे आपण सर्व अनुभवीत आहोत. अतिशय आक्रमक (व बिनडोक) पद्धतीने केला जाणारा हा प्रचार सर्वसामान्य जनता कसलाही विचार न करता का स्वीकारते, हा प्रश्नही आपल्याला त्रास देतो. सुकल्प कारंजेकर हे कोडे विज्ञानाच्या मदतीने हे कोडे सोडविताना आपल्याला ह्या अंकात भेटतील. 'इतिहासाचे काय करायचे?' हा देखील आजच्या काळातील असाच एक कळीचा प्रश्न. इतिहासाचे वारंवार पुनर्लेखन होण्याच्या ह्या काळात आपल्याला त्रासदायक वाटणाऱ्या (पण एकेकाळी इतिहासात आदराचे स्थान असणाऱ्या ) प्रतीकांचे काय करायचे हा प्रश्न जगभरातील लोकांना भेडसावीत आहे. ऱ्होड्स ह्या अमेरिकन धनवंताला एकेकाळी आफ्रिकेच्या इतिहासात गौरवाचे स्थान प्राप्त होते. पण 'पिरामिडच्या खालून लिहिल्या जाणाऱ्या' इतिहासाने त्याला खलनायक ठरविला व त्याच्या पुतळ्यांची मोडतोड करण्यात आली. हा संदर्भ घेऊन श्याम पाखरे हे इतिहासाचे अभ्यासक आपल्याला भारतीय समाजाच्या दृष्टीने एक मोलाची गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. फिल्म इन्स्टिट्यूट,

हैद्राबाद मध्यवर्ती विद्यापीठ व जे एन यु त माजलेल्या रणाच्या पार्श्वभूमीवर नंदा खरे आपल्याला 'लिबरल एज्युकेशन' देणारी, तरुणांमधील बंडखोरीला वाव देणारी, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहित करणारी विश्वविद्यालये भारतात निर्माण का होत नाहीत हे समजावून सांगत आहेत. धर्मांधतेच्या प्रश्नावर आतापर्यंत 'आजचा सुधारक'मधून बरेच वैचारिक साहित्य प्रकाशित झाले आहे. ह्या अंकात मात्र ह्या प्रश्नाचा वेध दोन वेगळ्या पातळ्यांवर घेण्यात आला आहे. आमचे दिवंगत मित्र व नर्मदा बचाव आंदोलनाचे बिनीचे कार्यकर्ते संजय संगवई ह्यांचा 'मुस्लीम समाजाने भारतीय शास्त्रीय संगीताला दिलेले योगदान' ह्या विषयावरील एक महत्त्वाचा लेख आम्ही दोन भागात पुनर्मुद्रित करीत आहोत. त्याद्वारे भारतातील गंगा-जमनी संस्कृतीचे एक विहंगम दर्शन आमच्या वाचकांना होईल. आमचे दुसरे स्नेही श्री अमर हबीब ह्यांनी त्यांच्या आंतरधर्मीय विवाहाचा आपला अनुभव ह्या अंकात मांडला आहे, तो हृदयस्पर्शी तर आहेच, पण धर्मभेदाच्या जटील प्रश्नालाही प्रेमाचे साधेसोपे उत्तर कसे पुरेसे ठरते हेही त्यातून आपल्याला उमगते.

गेल्या अनेक शतकांपासून प्रत्येक धर्मात सुरु असलेला 'पुराणपंथी वि. सुधारणावादी' हा संघर्ष आता ऐरणीवर आला आहे. त्याचे ऐतिहासिक महत्त्व विषद करणारी लेखमाला आम्ही ह्या अंकापासून सुरु करत आहोत. भारतातील एका संपन्न संप्रदायात रूढ असणाऱ्या एका भीषण स्त्री-विरोधी परंपरेविषयी बनविलेल्या माहितीपटाविषयीदेखील आपण ह्या अंकात जाणून घेणार आहोत. हा ऐवज आमच्या वाचकांना विचारप्रवृत्त करेल, अशी आशा आहे.

**[ टीप : *आजचा सुधारक*च्या मार्च 2016 च्या अंकातील *आत्मशोधार्थ शिक्षण* (बालकृष्ण पिशुपती) हा लेख मुंबई विद्यापीठाने दीक्षान्त समारंभानिमित्त प्रकाशित केलेल्या पुस्तिकेवरून प्रकाशित केला होता. ]**

# ऱ्होड्सचे पतन होताना

*श्याम पाखरे*

ऱ्होड्स, इतिहासाचे पुनर्लेखन, द. आफ्रिका , वर्णद्वेष

---------------------------------------------------------------------------

राष्ट्रवाद ही सतत प्रगमनशील संकल्पना आहे. प्रत्येक राष्ट्राच्या, राष्ट्रवादाचे कल्पनाविश्व वेगवेगळे असते व प्रत्येक राष्ट्रामध्ये यासंदर्भात स्थित्यंतरेही होत असतात. इतिहासाच्या पुनर्लेखनाच्या काळात एकेकाळी आदरस्थानी असणाऱ्या पण आता व्यापक समुदायाच्या रागद्वेषाचे लक्ष्य बनलेल्या प्रतीकांचे काय करायचे? ह्या प्रश्नाकडे डोळसपणे बघायला शिकविणारा हा लेख ..

---------------------------------------------------------------------------

**अद्भुतरम्य इतिहास**

19 वे आणि 20 वे शतक राजकीय नेत्यांच्या आणि महापुरुषांच्या (Heroes) पुतळ्यांच्या उभारणीचा सुवर्णकाळ म्हटला पाहिजे. विशेषत: 19 व्या शतकात उदयास आलेल्या अद्भुतरम्य (Romanticist) इतिहासलेखन-परंपरेमुळे या प्रक्रियेला गती मिळाली. अद्भुतरम्य इतिहासलेखन हे 17 व्या नि 18 व्या शतकात प्रभावी असलेल्या बुद्धिप्रामाण्यवादी (Enlightened) इतिहासलेखनाला एक प्रतिक्रिया म्हणून पुढे आले. बुद्धिवादी इतिहास हा अत्यंत विवेकवादी दृष्टिकोनातून लिहिला गेला होता. परंतु अद्भुतरम्य काळात बुद्धिप्रामाण्याऐवजी कल्पनाशक्तीला महत्त्व दिले गेले. इतिहासकार शेखअली यांच्या मते कलात्मकतापूर्ण, चमत्कारिक, नयनरम्य, काव्यात्मक, भावनात्मक, आदर्शवादी आणि बेताल संकल्पनांना यावेळी इतिहासलेखनात स्थान मिळाले. बुद्धिवादाऐवजी आता भावनात्मकता हा इतिहासलेखनाचा पाया झाला. अद्भुतरम्य इतिहासाच्या क्षेत्रात कार्लाईल मैकॉले, फ्रॉऊड आणि कार्ल मार्क्स ही प्रमुख नावे. त्यांपैकी कार्लाईल हा या परंपरेतील सर्वात प्रसिद्ध इतिहासकार. त्यांचा The French Revolution हा ग्रंथ अद्भुतरम्य इतिहासाचे उत्तम

उदाहरण आहे. त्याने लिहिलेल्या On Heroes and Hero Worship या ग्रंथाने आधुनिक काळात व्यक्तिपूजेचा पाया घातली. या ग्रंथात तो लिहितो. "इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून केवळ महापुरुषांचे चरित्र असते." त्यांच्या मते महापुरुषच इतिहास घडवत असतात.

अद्भुतरम्य इतिहास हा मध्ययुगीन मानसिकतेतून लिहिला गेला. 18व्या शतकाच्या शेवटी सुरू झालेला राष्ट्रवादांचा कालखंड आणि अद्भुतरम्य इतिहासलेखन, परंपरा यांचा अन्योन्यसंबंध आहे. या इतिहासलेखनाने राष्ट्राराष्ट्रांमधील स्पर्धेला आणि आक्रमक राष्ट्रवादाला चालना दिली. या परंपरेतूनच रुड्यर्ड किपलिंग याने 'श्वेत माणसावरील ओझे' (Write Man's Burden) हा सिद्धान्त मांडला. त्याने लिहिले की, अश्वेत लोकांवर राज्य करणे हे विधिलिखित आहे. नाझीपक्षाने आपल्या वांशिक श्रेष्ठत्वाचा सिद्धान्त या विचार-प्रवाहातूनच मांडला.

18 व्या शतकाच्या शेवटी अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धापासून सुरू झालेल्या राष्ट्रवादाच्या कालखंडात राजकीय नेत्यांच्या आणि महापुरुषांच्या सार्वजनिक पुतळ्यांच्या उभारणीला वेग आला. युरोपीय सत्तांनी त्यांच्या वसाहतींमध्ये-देखील स्वतःचे श्रेष्ठत्व वसाहतींमधील जित लोकांच्या मनावर बिंबवण्यासाठी सार्वजनिक पुतळ्यांची उभारणी केली. अलीकडे वादात सापडलेल्या सेसिल ऱ्होड्स यांच्या केपटाऊन विद्यापीठ, साऊथ अफ्रिका आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ, इंग्लंड येथील पुतळ्यांची उभारणी याच कालखंडात करण्यात आली.

### सेसिल ऱ्होड्स

सेसिल जॉन हेड्स 1853-1902 हे अफ्रिकेच्या वसाहतवादी इतिहासातील महत्त्वाचे नाव. ब्रिटिश उद्योजक, खाणसम्राट आणि राजकारणी असलेले ऱ्होड्स, उत्तर व्हिक्टोरियन कालखंडातील ब्रिटनचे एक महापुरुष म्हणून गणले जात कारण त्यांनी सर्वसामान्य मनुष्याप्रमाणे विवाह करून संसार न थाटता देशसेवेसाठी आपले आयुष्य वाहिले. आपल्या अलौकिक बुद्धिचातुर्यातून व उद्यमशीलतेतून त्यांनी अफ्रिकाखंडातील हिश्श्यासाठी, युरोपियन राष्ट्रामध्ये चाललेल्या लांडगेतोडीमध्ये इतर स्पर्धकांना मागे टाकले व ब्रिटनचे वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांच्या ब्रिटिश साउथ अफ्रिकन कंपनीने अफ्रिकेतील ऱ्होडेशिया

(आजचे झिम्बाब्वे आणि झांबिया) या भूभागावर अधिकार स्थापन केला. ऱ्होड्सने स्थापन केलेली एक कंपनी आजही हिऱ्याच्या खननात व व्यापारात जगात अग्रगण्य आहे. ब्रिटिश साम्राज्याचे कट्टर समर्थक ऱ्होड्स, ब्रिटिशवंशीय लोकांना सर्वश्रेष्ठ समजत आणि जगातील जितका जास्त भाग ब्रिटिश साम्राज्याखाली येईल, तितका तो मनुष्यजातीसाठी कल्याणकारक होईल, असे त्यांचे ठाम मत होते. अफ्रिकेतील मूळ अश्वेत लोकांना ते रानटी समजत. 1890 ते 1896 दरम्यान ऱ्होड्स आताच्या साउथ अफ्रिकेतील केप टाऊन वसाहतीचे पंतप्रधान होते.

शिक्षणाचे व ज्ञानाचे चाहते असलेल्या ऱ्होड्सने आपले महाविद्यालयीन शिक्षण ऑक्सफर्ड विद्यापीठातील ओरीअल महाविद्यालयात पूर्ण केले. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या शैक्षणिक परंपरेचा त्यांना अभिमान होता. ऱ्होड्सचे 42 व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मृत्युपत्रानुसार संपत्तीतील काही भाग शैक्षणिक कार्यासाठी देण्यात आला. त्यातूनच ऱ्होड्स ट्रस्ट या शैक्षणिक धर्मादायसंस्थेची स्थापना करण्यांत आली. मृत्युपत्रातील तरतुदींनुसार ऑक्सफर्ड विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी गैरब्रिटिश विद्यार्थ्यांसाठी पहिली आंतरराष्ट्रीय आणि प्रतिष्ठेची ऱ्होड्स शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली. जगभरातील 14 विभागांमधून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येते. 1977 नंतर महिलांनाही ही शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात झाली. 1991 नंतर अफ्रिकेतील अश्वेत विद्यार्थ्यांना देखील यांचा लाभ मिळू लागला. आज ऱ्होड्स ट्रस्टच्या ट्रस्टींमध्ये इन्फोसिसचे के. नारायणमूर्ती आणि बोत्स्वावानाचे माजी राष्ट्राध्यक्ष फेस्टस मोगै यांचाही समावेश होतो. ऱ्होड्स यांच्या वांशिक श्रेष्ठत्वाच्या विचारसरणीच्या अगदी विरुद्ध मूल्यांवर आज ऱ्होड्स ट्रस्ट कार्यरत आहे.

**ऱ्होड्सचे पतन**

सध्या चर्चेत असलेल्या "Rhodes Must Fall" (RMF) आंदोलनाची सुरुवात साउथ अफ्रिकेतील केपटाऊन विद्यापीठात झाली. आंदोलनकर्त्यांनी विद्यापीठ परिसरातील ऱ्होड्सचा ब्रॉझ पुतळा हटविण्याची मागणी केली. 9 मार्च 2015 रोजी आंदोलनकर्त्यांनी या पुतळ्यावर मानवी विष्ठेचा अभिषेक केला. 9

एप्रिल 2015 रोजी विद्यापीठ-परिषदेने हा पुतळा हटविण्याचा निर्णय बहुमताने घेतला. या बैठकी दरम्यान आंदोलनकर्त्यांनी "One Settler One Bullet" अशा हिंसक घोषणा दिल्या. शेवटी हा पुतळा हटविण्यात आला. या घटनेचे महत्त्व फक्त पुतळा हटविण्यापुरते मर्यादित नाही. ज्या पद्धतीने तो हटविण्यात आला. त्यातून आजच्या दक्षिण अफ्रिकेतील राष्ट्रवादाच्या संकल्पनेत होत असलेल्या स्थित्यंतराची जाणीव होते.

**राष्ट्रवादाचे कल्पनाविश्व**

राष्ट्रवाद ही सतत प्रगमनशील संकल्पना आहे. प्रत्येक राष्ट्रामध्ये यासंदर्भात स्थित्यंतरे होत असतात. बेनेडिक्ट अँडरसन यांच्या मते, "राष्ट्र म्हणजे मर्यादित, सार्वभौम आणि राजकीय असा एक काल्पनिक समूह". प्रत्येक राष्ट्राच्या राष्ट्रवादाचे कल्पनाविश्व वेगवेगळे असते. ज्या द्वेषाच्या, संतापाच्या भावनेतून ऱ्होड्सचा पुतळा हटविला गेला, त्यातून आजच्या साऊथ अफ्रिकन राष्ट्रवादाच्या कल्पनाविश्वात पूर्वी शासक असलेल्या परंतु आता सर्वसामान्य व अल्पसंख्यक नागरिक असलेल्या श्वेत नागरिकांचे व त्यांच्या ऐतिहासिक वारश्याचे स्थान काय या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात. याठिकाणी भारतीय स्वातंत्र्यलढ्यादरम्यान उद्भवलेल्या दोन विवादांचा उल्लेख करावासा वाटतो. पहिला विवाद लॉर्ड जॉन लॉरेन्स, जे 1864 ते 1869 दरम्यान भारताचे व्हाईसरॉय होते, त्यांच्या लाहोर येथील सार्वजनिक पुतळ्यासंबधी होता. एका हातात पेन आणि एका हातात तलवार असलेला लॉरेन्स यांचा पूर्णाकृती पुतळा, त्यांच्या चेहऱ्यावरील मगरूर भावासकट लाहोरच्या प्रसिद्ध चौकात उभा होता. या पुतळ्याच्या खाली एक प्रश्नात्मक वाक्य लिहिले होते, "Will you have the pen or the sword?" म्हणजे जनतेला असा प्रश्न विचारण्यात आला होता की त्यांना लेखणीचे शासन हवे आहे की तलवारीचे? लाहोरवासीयांच्या मनात निर्माण झालेल्या राष्ट्रवादाच्या भावनेमुळे हा पुतळा त्यांच्या डोळ्यात सलू लागला. 1921 साली लाहोर म्युनिसिपालटीने हा पुतळा हटविण्याचा ठराव पारित केला. परंतु ब्रिटिश नोकरशाहीच्या विरोधामुळे, त्यावेळी तो हटवता आला नाही. दुसरा विवाद कर्नल जेम्स नील याच्या चेन्नईमधील आताच्या अन्नासल्लाई भागातील पूर्णाकृती पुतळ्यासंबधी होता. "Butcher of Allahabad" म्हणून भारतीय

इतिहासात कुप्रसिद्ध असलेला कर्नल नील त्यावेळी ब्रिटिशांसाठी एक महापुरुष होता. 1857 चा उठाव दडपण्यामध्ये त्याने महत्त्वाचे योगदान दिले आणि आपल्या प्राणांची आहुती दिली. उठावाच्या वेळी कानपूरकडे कूच करताना वाटेत गावेच्या गावे जाळून गावकऱ्यांना फासावर लटकवण्याचे क्रौर्य त्याच्या नावावर जमा आहे. 1927 साली मद्रास लेजिस्लेटिव्ह काउंसिलमध्ये नीलचा पुतळा हटवण्याचा ठराव मांडण्यात आला. या दोन्ही विवादांच्या वेळी गांधींनी आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दिला. गांधींच्या मते हे दोन्ही पुतळे गुलामगिरीचे व दहशतवादाचे प्रतीक होते. जरी मागील पिढीने या पुतळ्यांसंबधी आक्षेप घेतला नव्हता, तरी गांधीच्या नेतृत्वाखाली विकसित होत गेलेल्या राष्ट्रवादाच्या कल्पनाविश्वात ह्या दोन्ही पुतळ्यांचे अस्तित्व राष्ट्रीय आत्मसन्मानाच्या विरुद्ध होते. या दोन्ही प्रकरणांत गांधीनी अहिंसात्मक आंदोलन चालवून विरोधकांचे मन:परिवर्तन करण्यास सांगितले.

आज कर्नल नीलचा तो पुतळा चेन्नईतील मद्रास म्युझिअमच्या तळघरात उभा आहे, तर लॉरेन्सचा पुतळा इंग्लंडला नेण्यात आला. आज तो फॉयल अँड लंडनडेरी महाविद्यालयाच्या प्रांगणात उभा आहे. लॉरेन्सच्या पुतळ्याला लाहोरवासीयांचा विरोध हा ब्रिटिशसाम्राज्यवादविरोधी लढ्याचा एक भाग होता. परंतु लाहोरमधीलच दुसऱ्या एका पुतळ्याचे प्रकरण जरा वेगळे आहे. हा पुतळा एकेकाळी लाहोरवासीयांना आदरणीय असलेल्या लाला लाजपत राय यांचा होता. हा पुतळादेखील लाहोरच्या त्याच सुप्रसिद्ध चौकात उभारण्यात आला होता. लाहोरमध्ये सायमन कमिशनविरोधी मोर्चाचे नेतृत्व करताना ब्रिटिश पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात जखमी होऊन लालाजींचा मृत्यू झाला होता. परंतु 1947 साली झालेल्या फाळणीमुळे भारत आणि पाकिस्तान या दोन नवनिर्मित राष्ट्रांच्या राष्ट्रवादाच्या कल्पनाविश्वाचीही फाळणी झाली. नवनिर्मित पाकिस्तानमध्ये लालाजींच्या पुतळ्याला स्थान नव्हते. लाहोरमधील तो पुतळा हटवण्यात आला.

राष्ट्रवादाच्या कल्पनाविश्वातील स्थित्यंतराचे एक अत्यंत समर्पक उदाहरण म्हणजे आतापर्यंत वर्णद्वेषविरोधी आंतरराष्ट्रीय लढ्याचे एक प्रेरणास्थान असलेल्या गांधींच्या जोहान्सबर्ग येथील एक पुतळ्याचे. 13 एप्रिल 2015 रोजी

जेव्हा पंतप्रधान मोदी जर्मनीमध्ये गांधींच्या पुतळ्याचे अनावरण करत होते, त्याच दिवशी साऊथ अफ्रिकेतील जोहन्सबर्गमध्ये एका समूहाने गांधींच्या पुतळ्याची विटंबना केली. याप्रसंगी "वर्णद्वेषी गांधींचे पतन झालेच पाहिजे'' अशी घोषणा देण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी गांधींच्या विचारांमध्ये आलेल्या स्थित्यंतरांकडे लक्ष न देता, त्यांनी साऊथ अफ्रिकेत आल्यानंतर सुरुवातीच्या काळात मूळ अफ्रिकन अश्वेतांबद्दल व्यक्त केलेल्या काही मतांबद्दल, त्यांना सरळ वर्णद्वेषी ठरविले.

साऊथ अफ्रिकेतील यशस्वी आंदोलनानंतर आता Rhodes Must Fall आंदोलनाचे लोण ऑक्सफर्ड विद्यापीठात पोहोचले आहे. मागे उल्लेख केल्याप्रमाणे ऑक्सफर्ड येथील ओरीअल महाविद्यालयात ऱ्होड्सचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले होते. येथील, विशेषत: अफ्रिकन विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील ऱ्होड्सचा पुतळा हटवण्याची मागणी केली आहे. आंदोलनाचे नेतृत्व नटोकोझो क्वाबे हा अफ्रिकन अभ्यासक  करत आहे. विशेष म्हणजे त्याला ऱ्होड्स शिष्यवृत्ती मिळाली आहे. ओरीअल महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी या आंदोलनाची योग्य दखल घेतली आहे. अफ्रिकन विद्यार्थ्यांच्या आंदोलनाप्रती संवेदनशीलता दाखवत त्यांनी महाविद्यालयपरिसरातील ऱ्होड्सचा गौरव करणारी कोनशिला काढून टाकली आहे. तसेच, ऱ्होड्सच्या पुतळ्याखाली स्पष्टीकरणासाठी एक सूचना लावली आहे. त्यात लिहिले आहे की, "ऱ्होड्सने शैक्षणिक क्षेत्रासाठी दिलेल्या आर्थिक देणगीच्या ऐतिहासिक सत्याची दखल घेऊनदेखील, महाविद्यालय कोणत्याही प्रकारे त्यांच्या विवादास्पद मतांकडे आणि कृत्यांकडे दुर्लक्ष करीत नाही किंवा त्यांचा गौरव करीत नाही." परंतु महाविद्यालय अधिकाऱ्यांनी तो पुतळा हटवण्यास नकार दिला आहे. तरीदेखील RMF आंदोलन चालूच आहे आणि जगाचे लक्ष वेधून घेत आहे.

**उपसंहार**

प्रश्न हा आहे की ऱ्होड्सचा पुतळा हटवल्याने इतिहास कसा पुसला जाणार? तेव्हा खरी समस्या निर्माण होते, जेव्हा ऐतिहासिक व्यक्तींचे आजच्या मानकांवर मूल्यमापन केले जाते. ऱ्होड्स हे उत्तरव्हिक्टोरियन काळाचे अपत्य होते. फक्त ऱ्होड्स नव्हे तर ब्रिटेनमधील एक संपूर्ण पिढी या काळात

साम्राज्यवादी प्रचारतंत्रामुळे संमोहित झाली होती. अफ्रिकेवर वसाहतवाद लादून अफ्रिकन जनतेचे शोषण करणारे ऱ्होड्स हे जसे एक वास्तव आहे, तसेच, आपल्या मृत्युपत्राद्वारे शिक्षणासाठी मोठी रक्कम देणगी देणारे ऱ्होड्स हेदेखील एक वास्तव आहे. साऊथ अफ्रिकेच्या आधुनिकीकरणातील त्यांच्या बऱ्यावाईट परिणामांसह ऱ्होड्सचा वाटा नाकारता येत नाही. त्यांचे ऑक्सफर्ड विद्यापीठातील शैक्षणिक क्षेत्रातील योगदानदेखील नाकारता येत नाही. ऱ्होड्सला सरसकट एक खलनायक म्हणून रद्दबातल ठरविता येईल काय? तसे करणे म्हणजे ऐतिहसिक वास्तव नाकारण्यासारखे होईल. आपल्याला इतिहास त्यातील तथाकथित नायक आणि खलनायकांसह स्वीकारावा लागेल. कारण एका समूहासाठी नायक असलेली एक ऐतिहासिक व्यक्ती दुसऱ्या समूहासाठी खलनायक ठरते. इतिहासाचे विश्लेषण आणि ऐतिहासिक व्यक्तीचे मूल्यमापन स्थलकालपरत्वे बदलत राहणार. हा बदल आपण डोळसपणे स्वीकारला पाहिजे. त्यासाठी इतिहासाची पाने जपली पाहिजे. संतापाच्या व द्वेषाच्या भरात ती फाडून टाकल्याने  प्रश्न सुटणार नाही. ऱ्होड्सचा पुतळा हटवल्याने, एक वेळेस ऱ्होड्स संपल्याचा भ्रम होऊ शकतो. परंतु आजही युरोप, अमेरिकेतील बऱ्याच श्वेत नागरिकांच्या मनात वंशश्रेष्ठत्वाच्या स्वरूपात राहणाऱ्या ऱ्होड्सचे काय करणार? ई.एच. कार यांनी म्हटल्याप्रमाणे इतिहास म्हणजे वर्तमानकाळ आणि भूतकाळामधील कधीही न संपणारा संवाद. आपल्याला ऱ्होड्सशी संवाद साधायला हवा, त्याला जाणून घ्यायला हवे. या संवादातून आजही वंशवर्णजाति-श्रेष्ठत्वाच्या भावनेने  मनात लपलेल्या ऱ्होड्सला संपवता येईल.  कदाचित ऱ्होड्सचा पुतळा हटवला जाईल, परंतु इतिहासाच्या पानांतील ऱ्होड्सला जपावे लागेल.

**ईमेल** : shyam.pakhare111@gmail.com

***

# गोष्ट विचारांच्या प्रवासाची

*सुकल्प कारंजेकर*

माहिती जनुके, *सेल्फिश जीन*, रिचर्ड डॉकिन्स, इन्टरनेट

---

सामाजिक माध्यमांद्वारे कसलाही आधार नसलेले समाजविघातक विचार कसे वेगाने पसरविले जात आहेत, हे आपण अनुभवीत आहोत. त्यामागील शास्त्रीय कारणपरंपरा उलगडून दाखविणारा हा उद्बोधक लेख

---

अलिकडच्या काळात लोक इंटरनेटचा वापर प्रामुख्याने आपले राजकीय अथवा धार्मिक विचार पसरविण्यासाठी करतात असे दिसून येते आहे. अशा विचारांची बीजे memes या नावाने ओळखली जातात. त्याला मराठीत *माहिती जनुके* असे म्हणूया. हे विचार कसे पसरतात ती प्रक्रिया समजावून देण्याचा प्रयत्न मी ह्या लेखातून केला आहे.

माहिती जनुकांची संकल्पना ही सर्वप्रथम प्रसिद्ध उत्क्रांतिवादी जीवशास्त्रज्ञ रिचर्ड डॉकिन्स ह्यांनी त्यांच्या *सेल्फिश जीन* ह्या प्रसिद्ध पुस्तकातील शेवटच्या प्रकरणात मांडलीविज्ञानविश्वात प्रभावी ठरलेल्या पुस्तकांच्या यादीत त्याचा अनेकदा उल्लेख होतो. या पुस्तकाचे वैशिष्ट्य हे की जनुकांच्या दृष्टिकोनातून उत्क्रांतीची गोष्ट अतिशय स्पष्ट व सुबोध पद्धतीने ह्या पुस्तकात मांडलेली आहे. माहितीजनुकांची संकल्पना पाहण्याआधी आपण जनुकांची संकल्पना समजून घेऊया.

उत्क्रांतीच्या प्रक्रियेत विश्वात टिकून राहण्यासाठी आवश्यक असलेली वैशिष्ट्ये कोणत्याही प्रजातीत जनुकांच्या माध्यमातून नियंत्रित केली जातात. ती आपल्या डी. एन. ए. (D. N. A.) मध्ये श्रेणीबद्ध केलेली असतात. जनुके स्वयंप्रतिकृतीद्वारे प्रसारित होतात व माणसाचे (अथवा इतर जिवांचे) शरीर हे जनुकांचे तात्पुरते साधन किंवा वाहन असते. उच्च दर्जाची जनुके ही त्या विशिष्ट

प्रजातीला जिवंत राहण्यास तसेच तिचे पुनरुत्पादन करण्यात मदत करतात. पुनरुत्पादनाद्वारे ही जनुके एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. प्राण्याचे शरीर नष्ट झाले तरीही त्याची जनुके ही पुढील पिढीच्या रूपात अखंड प्रवास करतात. प्राणी जन्माला येतात, पुनरुत्पादन करतात आणि मरतात, पण जनुके मात्र अमर असतात. जनुकांची जगात टिकून राहण्यासाठी इतर समांतर जनुकांबरोबर सतत स्पर्धा सुरू असते. ह्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी जनुकांना स्वार्थी प्रवृत्ती ठेवावी लागते. जी जनुके टिकून राहण्यासाठी तसेच पुढील पिढीमध्ये संक्रमित होण्यासाठी आवश्यक ते बदल प्राण्याच्या शरीरामध्ये घडवून आणतात, ती स्वतःचा स्वार्थ तर साधतातच, पण त्याबरोबर त्या प्राण्याला लाभही पोहचवतात. कारण जनुकांचे अस्तित्व हे प्राण्याच्या अस्तित्वावर आधारित असते. एका प्रजातीच्या वेगवेगळ्या सदस्यांच्या शरीरांत काही समान तर काही वेगळी अशी जनुके असतात. अशा प्रकारे एका प्रजातीच्या जनुकांचा संग्रह बनतो. ती एखाद्या प्राण्याच्या शरीरात एकत्र आल्यास त्यांना त्या प्राण्याच्या जिवंत राहण्यासाठी आणि त्याचे प्रजोत्पादन होण्यासाठी एकमेकांशी साहाय्य करावे लागते. वेगळ्या प्रजातीतील जनुके मात्र एकमेकांना साहाय्य करीत नाहीत. त्यामुळे वेगळ्या प्रजातीतील प्राण्यांचे संकर केल्यास त्यांचे अपत्य हे जन्मजात वंध्य असते.

एका प्रजातिसंग्रहातील एखादे जनुक हे संग्रहातील दुसऱ्या जनुकाला साहाय्य करीत नसेल तर त्याचा प्राण्याच्या जिवंत राहण्याच्या संघर्षावर विपरीत परिणाम होतो आणि प्राणी जगण्यास असमर्थ ठरल्यास त्याच्या शरीरातील जनुके पुढील पिढीत प्रसारित होत नाहीत. चांगली जनुके ही ( इतर जनुकांना सहकार्य करणारी) इतर प्राण्यांच्या माध्यमातून जिवंत राहतात. परंतु वाईट जनुके ( इतर जनुकांना सहकार्य न करणारी) मात्र हळूहळू जनुकांच्या संग्रहातून नष्ट होतात.

काही जनुके मात्र प्रसारित होण्यासाठी वेगळ्या मार्गाचा वापर करतात. ती प्राण्याच्या पुनरुत्पादनाद्वारे प्रसारित न होता परजीवींद्वारे प्रसारित होतात. जनुकांची पुनरुत्पादनाद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होण्याची प्रक्रिया आनुवांशिक असते तर परजीवींच्या एका प्राण्याच्या शरीरातून दुसऱ्या

प्राण्याच्या शरीरात प्रसारित होण्याची प्रक्रिया ही समांतर असते. जीवाणू (व्हायरस)ची जनुके ही अश्या समांतर प्रक्रियेने प्रसारित होतात.

व्हायरसची जनुके ही एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश करीत असली तरी त्यांचा हेतू हा ज्या शरीरात प्रवेश केला त्या शरीरारातील इतर जनुकांशी साहाय्य करण्याचा नसतो. व्हायरस शरीरात पसरलेला प्राणी मरण पावला तर व्हायरसचे विषाणुदेखील मरण पावतात परंतु त्यापूर्वीच आपल्या प्रतिकृती दुसऱ्या शरीरात पोचविण्यात त्यांना यश आलेले असते. त्यामुळे त्यांचा समांतर प्रसार झालेलाच असतो. ही व्हायरसची जनुके ज्या शरीरात शिरतात त्या व्यक्तीच्या खोकला, शिंक, विष्ठा अशा अनेक मार्गाने ते समांतर प्रवास करतात. अशा प्रकारे व्हायरस हे आपल्या समांतर प्रवासासाठी प्राण्याच्या वागणुकीत बदल घडवून आणतात. जसे की व्हायरसबाधित व्यक्तीला सततचा खोकला होणे किंवा शिंका येणे इत्यादी. व्हायरस ज्या शरीरात शिरतील त्या शरीराच्या जिवंत राहण्यास अथवा प्रजनन होण्यास व्हायरसला स्वारस्य नसते. फक्त वेगाने जास्तीत जास्त प्राण्यांपर्यंत पोचण्याचे कार्य व्हायरसची जनुके करतात.

थोडक्यात, दोन्ही प्रकारच्या जनुकांचा हेतू त्यांच्या जास्तीत जास्त प्रतिकृती तयार करणे असा असतो. मात्र प्राण्याच्या जनुकांना संक्रमित होण्यासाठी प्राण्याचे जिवंत राहणे आणि पुनरुत्पादन होणे आवश्यक असते तर व्हायरसच्या जनुकांना मात्र प्राण्याच्या हिताची पर्वा नसते, कारण ती समांतर पातळीवर प्रसारित होतात. अर्थातच इथे हेतू शब्दाचा अर्थ असा मात्र नाही की जनुके ही विचारपूर्वक विशिष्ट पद्धतींचा वापर करून त्यांच्या प्रतिकृतींचा प्रसार करतात. त्यांच्या कृतींच्या परिणामातून विशिष्ट फलित मात्र निश्चित जाणवते. यावरून जनुकांची व व्हायरसची कार्यपद्धती, त्यांचे वर्तन व हेतू आपल्या लक्षात आले असेल. आता माहितीजनुकांकडे वळूया.

रिचर्ड डॉकिन्स ह्यांनी माहिती जनुकाची व्याख्या 'सांस्कृतिक प्रेषण एकक' किंवा 'अनुकरणाचे एकक' अशी केली आहे. तो पुढे म्हणतो की संगीतातील सूर, नवनवीन कल्पना, काही वाक्यांश, कपड्यांची फॅशन, मातीची भांडी बनविण्याची पद्धत किंवा एखादी बांधकामातील कमान अशी अनेक उदाहरणे माहिती जनुकांसाठी देता येतील. माहिती जनुकांची संकल्पना स्पष्ट करणारा 'सेल्फिश

जीन’ मधील हा उतारा ---

'जनुके ही शुक्राणूच्या अथवा स्त्रीबीजाच्या माध्यमातून एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रसार करतात. तद्वतच माहितीजनुके ही एका मेंदूतून दुसऱ्या मेंदूत प्रवेश करतात. तो प्रसार अनुकरणाच्या माध्यमातून होत असतो. एखादा शास्त्रज्ञ ज्यावेळी एखादी चांगली कल्पना ऐकतो अथवा वाचतो आणि ती कल्पना आपल्या सहकाऱ्यांकडे किंवा विद्यार्थ्यांकडे पोचवतो, तसेच ती कल्पना तो कधी लेख लिहून तर कधी व्याख्यानांच्या द्वारे लोकांपर्यंत पोचवतो. ती कल्पना लोकांना आवडली, त्यांनी ती स्वीकारली तर ती त्या लोकांमार्फत अधिक लोकांपर्यंत पोचण्याची प्रक्रिया सुरू होते. अशा प्रकारे कल्पना जणु स्वतःच्या अधिकाधिक प्रतिकृती तयार करतात.'

ह्या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की या माहिती जनुकांचे प्रेषण हे व्हायरसप्रमाणे समांतर पातळीवर होत असते. रिचर्ड डॉकिन्सचे सहकारी एन. के. हम्फ्रे यांनी या माहितीजनुकांच्या व्हायरससदृश वर्तनाचे खालीलप्रमाणे तपशिलात वर्णन केले आहे. ते म्हणतात ---

'माहिती जनुकांकडे जिवंत संरचना म्हणून पाहावे लागेल --- केवळ रूपकात्मक नव्हे तर तांत्रिकदृष्ट्या सुद्धा. ज्यावेळी तुम्ही एखादी सुपीक कल्पना माझ्या मनात पेरता, त्याक्षणी अक्षरशः माझ्या मनात परजीवी संक्रमित करता आणि माझा मेंदू माहितीजनुकाचे प्रेषण करणारे वाहन बनतो आणि प्रसाराचे माध्यम म्हणून मेंदूचे कार्य सुरू होते. माहितीजनुकांचे व्हायरसबरोबरचे साम्य हे वरवरचे नसून माहिती जनुकांचा माणसाच्या वर्तणुकीवरील परिणाम हा व्हायरसच्या परिणामासारखाच असतो. 'मरणानंतरचे अस्तित्व’ ह्या कल्पनेवर जेव्हा जगभरातील कोट्यवधी लोक विश्वास ठेवतात तेव्हा त्या कल्पनेचे स्वतःचे असे अस्तित्व दिसून येते.’

एका अत्यंत प्रभावी आणि चिवट अशा माहिती जनुकाचे उदाहरण म्हणजे आपल्या धार्मिक श्रद्धा व समजुती. धार्मिक श्रद्धा ह्या काही माणसाच्या D. N. A. मध्ये श्रेणीबद्ध झालेल्या नसतात. तर त्या मुलांना लहानपणापासून शिकविल्या जातात. प्रत्येक बालकाला आपापल्या धर्माचे रीतीरिवाज कुटुंबात शिकविले जातात. ही मुले लहानाची मोठी झाल्यावर व त्यांना स्वतःची मुले-

बाळे झाल्यावर त्यांनाही धार्मिक श्रद्धांची ही पुरचुंडी देण्याची प्रक्रिया गिरविली जाते. ही प्रक्रिया आनुवांशिक प्रक्रियेहून वेगळी आहे. कारण धार्मिक श्रद्धा ह्या पूर्णपणे कौटुंबिक पार्श्वभूमीवर आधारित असतात. तसेच जी माणसे कट्टर धार्मिक असतात ती अधिकाधिक लोकांपर्यंत आपल्या श्रद्धा पोचवण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे धर्माचा प्रसार हा समांतर पातळीवर होत असतो. धर्मासारख्या दुसऱ्या प्रभावी माहिती जनुकांचे उदाहरण म्हणजे राजकीय मतप्रणाली. इतिहासात हुकुमशाही विचारांचा प्रचार ज्या जोरकसपणे होत गेला तो कट्टर धर्मभावनेच्या प्रचाराइतकाच प्रभावी होता.

माहिती जनुके ही माणसांचा त्यांच्या प्रचाराचे साधन म्हणून वापर करतात. परंतु अशावेळी असा प्रश्न पडतो की काही माणसे ही माहिती जनुकांची वाहक बनण्यास बळी का पडतात? ज्या पद्धतीने माणसाचा मेंदू उत्क्रांतीद्वारे विकसित झाला आहे ती प्रक्रिया ह्याला कारणीभूत आहे. मानवी मनाची रचनाच अशी आहे की त्यात कल्पना, विचार टिपून घेण्याची, शोषून घेण्याची उच्च दर्जाची क्षमता आहे. त्यामुळेच बालवयात मूल आपल्या पालकांची भाषा शिकू शकते, शालेयशिक्षण आत्मसात करते तसेच धार्मिक श्रद्धा व सभोवतालच्या अनेकविध कल्पना शिकते. मात्र लहान मुलांना चांगले-वाईट, खरे-खोटे यातील फरक कळेल इतकी वैचारिक प्रगल्भता त्यांच्यात नसते. त्यामुळे मुलांवर स्वतःच्या श्रद्धा आंधळेपणे न लादणे ही विवेकवादी पालकांची जवाबदारी असते.

मी जनुकांबद्दल बोलताना जसा जनुकांच्या संग्रहाचा उल्लेख केला तसाच माहितीजनुकांचा देखील संग्रह असतो. ह्यातील काही माहितीजनुके ही इतर माहितीजनुकांना सहाय्य करतात तर काही माहिती जनुके इतर माहितीजनुकांचा विरोध करतात. तसेच माहितीजनुके ही त्यांच्या भल्यासाठी त्यांच्या वाहकाच्या वर्तनात बदल घडवून आणतात.

एखादी वैज्ञानिक कल्पना सिद्ध करण्यासाठी समर्थ असे पुरावे असावे लागतात. सापेक्षता सिद्धान्त, पुंजयामिकी सिद्धान्त किंवा उत्क्रान्तिवाद हे सर्वमान्य आहेत कारण त्यांच्या मागे जबरदस्त, ठोस पुराव्यांचे पाठबळ आहे. कोणताही वैज्ञानिक सिद्धान्त किंवा विचार व्यापक परीक्षणांतून, विविध उलट तपासण्यांतून, समकालीन अभ्यासकांच्या चिकित्सेतून, सातत्यपूर्ण केलेल्या

प्रयोगातून तावून सुलाखून निघतो तेव्हाच तो लोकप्रिय आणि लोकमान्य होतो. या उलट धार्मिक श्रद्धांच्या संदर्भात ह्यातील काहीही घडत नाही. किंबहुना स्वर्ग-नरक, पुनर्जन्म, ईश्वर या संदर्भात कोणत्याही पुराव्याशिवाय, प्रश्नांशिवाय विश्वास ठेवला जातो. आणि कित्येकदा धार्मिक लोक सर्वमान्य वैज्ञानिक सिद्धान्ताला (उदा. उत्क्रान्तीचा सिद्धान्त) विरोध करतात, कारण तो सिद्धान्त त्यांच्या धार्मिक कल्पनांना तडा देतो. इथे धार्मिक माहितीजनुके ही वैज्ञानिक माहितीजनुकांना पूरक नाहीत हे लक्षात येते. व्हायरस आपल्या वाहक प्राण्याच्या वर्तनात बदल करतात आणि स्वतःचा प्रसार करतच राहतात त्याप्रमाणेच हे घडते.

जी कल्पना ही माणसाच्या मनात बीज धरते ती माणसालाच स्वतःच्या प्रतिकृती करण्याचे साधन म्हणून वापरते हे विलक्षण आहे. जेव्हा लोक इंटरनेटचा वापर आपल्या धार्मिक किंवा राजकीय कल्पना पसरवण्यासाठी करतात तेव्हा ते माहिती जनुकांच्या प्रभावाखाली वावरत असतात. माहिती जनुकांचा अनिर्बंध प्रसार रोखण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपले विचार पसरवण्याआधी विचारांना पाठबळ देणारे पुरावे आहेत का हे पडताळून पाहणे. चुकीचे माहिती जनुके ही समाजाला घातक ठरतात व त्यांच्या अनिर्बंध प्रसाराची परिणीती सामाजिक अस्थिरता व रक्तपातात होऊ शकते. आजवर धर्मांच्या नावाखाली अथवा विशिष्ट राजकीय विचारसरणीच्या नावाखाली जी युद्धे, दंगली व रक्तपात घडला त्याला अशाच माहितीजनुकांचा प्रभाव कारणीभूत आहे.

परंतु सगळे चित्र काही निराशावादी मात्र नाही आणि सगळीच माहितीजनुके हानिकारक नसतात. उत्तम संगीत, साहित्य, चित्रकला व अन्य सर्जनशील कलांचा प्रसारही माहिती जनुकांच्या माध्यमातूनच होत असतो. चांगल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार हिंसेला थांबवू शकेल व जगात शांतता वाढण्यास मदत करेल अशी मला आशा आहे.

कारण विसाव्या शतकात एकीकडे जेव्हा नाझी व हिटलरच्या हुकुमशाही व वंशविद्वेषी विचारांचे विष पसरत होते, तेव्हाच दुसरीकडे महात्मा गांधी करुणेचा व अहिंसेचा संदेशही जगभर तितक्याच प्रभावीपणे पोचवत होते.

**ईमेल:** sukalp.karanjekar@gmail.com

# आपण विद्यापीठे घडवतो, विश्वविद्यालये नाही !

*नंदा खरे*

जे एन यु, उच्च शिक्षण, विचारस्वातंत्र्य

---------------------------------------------------------------------

प्रचंड राजकीय मरगळ असण्याच्या ह्या काळात एखादा कन्हैया कुमार कसा तयार होतो, ह्याचा माग घेतल्यास आपण थेट जेएनयुच्या प्रपाती, घुसळणशील वातावरणा-पर्यंत जाऊन पोहचतो. तिथल्यासारखे विद्रोही, प्रश्न विचारण्यास शिकविणारे वातावरण उच्च शिक्षणाच्या सर्वच केंद्रांत असणे का आवश्यक आहे, हे सांगणारा हा लेख.

---------------------------------------------------------------------

"रस्त्याने चालताना किंवा बागेतल्या बाकांवर बसून जर दोन माणसे वाद घालत असतील तर त्यांपैकी विद्यार्थी कोण, डॉन (= प्राध्यापक) कोण, हे ओळखणे सोपे आहे. जास्त आक्रमक तो विद्यार्थी आणि पडेल, मवाळ तो डॉन." केंब्रिज युनिव्हर्सिटीतल्या स्थितीबद्दलचा हा शेरा आहे. का घडते असे?

मॅक्स बीरबॉम सांगतो, "विद्यार्थ्यांमधला जो उन्मादी वेडेपणा शाळा ठोकूनपिटून काढून टाकतात, तो ऑक्सफर्ड-केंब्रिजमध्ये हलक्या हाताने पुन्हा त्यांच्यात भरला जातो." म्हणजे प्राध्यापकांना, एकूणच 'सत्ताधीशांना' घाबरू नका, हे प्रयत्नाने शिकवले जाते!

माझा एक मित्र (सुबोध जावडेकर) माणसांचे व प्राण्यांचे मेंदू कसे वयासोबत विकसित होतात, कसे काम करतात, वगैरेंचा अभ्यास करत असतो. माणसाचे मेंदू वयाच्या पंचविसाव्या वर्षांपर्यंत विकसित होत असतात. वयात येणे, म्हणजे लैंगिकदृष्ट्या सक्षम होणे मात्र सुमारे दहाबारा वर्षे आधीच घडते. एका अर्थी ही 'उन्मादी वेडेपणा'ने लैंगिक प्रयोग करण्याची दशकभराची संधीच असते. कारण माणसे प्रयोगक्षम असतात पण परिपक्व नसतात. माझ्या मित्राला वाटते की यात काहीतरी परिस्थितीशी अनुरूपता वाढवणारे, म्हणजे जीवजातीच्या उत्क्रांतीला पूरक अंग असावे.

मुळात एकपेशीयांच्या पेशीविभाजनातून लिंगभेद आणि लैंगिक प्रजनन उद्भवले ते उत्क्रांतीला पूरक म्हणून, असे लिन मार्गेलिस या शास्त्रज्ञ स्त्रीचे म्हणणे आहेच, एका अर्थी गुणावगुणांचे पत्ते पिसले जात असतात आणि परिस्थितीशी जुळते गुणसंच टिकत असतात, तर फटकून असणारे गुणसंच बाद होत असतात. या पत्ते पिसण्याचा वेग लैंगिक व्यवहाराने वाढतो.

आणि जे लैंगिक व्यवहाराबद्दल शक्य आहे तेच सामाजिक-राजकीय वागणुकीबद्दलही शक्य आहे. अपरिपक्व प्रयोगशीलतेने नवनवे पर्याय घडवून त्यांपैकी परिस्थितीशी अनुरूप वागणे विकसित होत असते, हे शक्य आहे.

प्रथमा बॅनर्जींचा 'थँक गॉड फॉर जे एन यू' हा लेख (इंडियन एक्सप्रेस, 18 फेब्रु.2016) हेच सुचवताना दिसतो. बॅनर्जी 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज' या संस्थेत संशोधक म्हणून काम करतात, आणि त्यांचे शिक्षण जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीत (JNU त) झाले आहे, विद्यार्थिदशेतल्या अनुभवांबद्दल त्या लिहितात, "माझ्यासाठी जेएनयू ला प्रवेश हे प्रचंड स्वातंत्र्य होते. आपले पंख पसरायला मला मोठा अवकाश मला मिळाला. रात्रीबेरात्री वसतिगृहाबाहेर भटकायचे स्वातंत्र्य (विशेषतः तरुण मुलींना!) वाचनालयातील व मेसमधील चर्चासत्रे, वर्ग-जात-देश अशा सीमा भेदून केलेल्या मैत्र्या..."

बॅनर्जी नोंदतात की वंचितांना जेएनयूत प्रवेश मिळणे आवर्जून सोपे केले जाते. प्रांत, जात, घरात शिक्षण किती पिढ्या घेतले जात आहे, साऱ्या बाबींमधून वंचितांचे विशेष स्वागत केले जाते.

स्वातंत्र्य केवळ मैत्रीचेच नव्हते, हे त्या सांगतात, "आणि सर्वांना महत्त्वाचे म्हणजे सर्व सामाजिक भेदरेषा ओलांडून प्रेमात पडण्याचे स्वातंत्र्य". म्हणजे त्यांना लैंगिक व्यवहारातील उन्मादी वेडेपणाही जाणवतो! पण तेवढाच मात्र नाही.

शिक्षकांशी असलेल्या संबंधांबद्दल त्या लिहितात, "त्यांना नावाने एकेरीत संबोधायची परवानगी असे. चर्चांमध्ये वेळेची मर्यादा नसे. वर्गात उपस्थित राहणे, परीक्षा वगैरेंचे नियम सैल असत. फार कशाला, चहा-सिगारेटींमध्येही ते साथ देत."

पुढे त्या लिहितात, "जर आपल्याला हे फालतू, (trivial) वाटत असेल तर समजावे, की आपण बंधने तोडणे किती महत्त्वाचे असते हे विसरण्याइतके

म्हातारे झालो आहोत. बंधने गळून पडल्याशिवाय आपण जबाबदार तरुण-प्रौढ होऊ शकत नाही. प्रयोग करण्याचे, चुका करण्याचे, त्या सुधारून नव्याने चुका करण्याचे स्वातंत्र्य, अगदी नको तितके स्वातंत्र्य, हे आवश्यकच असते."

आणि हे सारे करून शिकायचे काय? "जेएनयू त आम्ही सर्व साहसे-दुस्साहसे करून एक महत्त्वाचा धडा शिकत असू. भौतिक (ऐहिक) व सामाजिक-दृष्ट्या स्वतंत्र अवकाशातच मन मुक्त होऊ शकते. लोकशाही, मतवैविध्य आणि समता यांतूनच बौद्धिक क्षमता आणि गुणवत्ता घडू शकते. हे खरे तर नसले तर पोथीबद्धता, कंटाळा आणि मठ्ठपणा उद्भवण्याचा प्रचंड धोका संभवतो."!

बॅनर्जीचा लेख प्रकाशित व्हायच्या आदल्याच दिवशी 'हिंदू' वृत्तपत्राने अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरचे शिकागो युनिव्हर्सिटीचे मत प्रकाशित केले. "युनिव्हर्सिट्यांचे काम व्यक्तींना नावडत्या किंवा तीव्रतेने क्लेशदायी संकल्पनांपासून व मतांपासून सुरक्षित ठेवण्याचे नाही. संकल्पना कितीही नावडत्या असल्या तरी संवादाची सभ्यता, परस्परांबद्दल आदर, असली कारणे देऊन त्यांच्यावरील चर्चा थांबवता येत नाही."

एकेकाळी 'युनिव्हर्सिटी' या शब्दाला भारतीय प्रतिशब्द 'विश्वविद्यालय' हा होता. विद्यार्थी व शिक्षक यांनी विद्या देण्याघेण्यासाठी घडवलेले विश्व, (universe) म्हणजे विश्वविद्यालय. मग कधीतरी युनिव्हर्सिटीसाठी 'विद्यापीठ' हा शब्द वापरला जाऊ लागला. मुक्त, व्यापक विश्वाची जागा अधिकारावर बेतलेल्या पीठाने घेतली. जी संस्था विद्येखेरीज कशालाही महत्त्व न देणारी, श्रेणी आणि विषमता नकारणारी हवी; तिचे रूप बदलले. पीठ आले की पीठाधीश, पीठाधिपती आले. वरचे आणि खालचे असा श्रेणी आल्या. 'आलय'ही गेले आणि 'विश्व'ही. उरले केवल डुढ्ढाचार्य पीठाधिपती आणि त्यांचे लष्कर-ए-होयबा!

विज्ञानक्षेत्रात भारतीय माणसाला एकच नोबेल पारितोषिक आहे, तेही स्वातंत्र्य मिळण्याआधीचे. 'भारतीय वंशा'च्या तिघांना विज्ञान-नोबेल्स आहेत, आणि तिघेही सांगतात की ते भारताबाहेर पडले, आणि मगच खऱ्या अर्थी संशोधन करू शकले. लोकसंख्येच्या प्रमाणात शोधनिबंध किती, लोकसंख्येच्या प्रमाणात पेटंट्स किती, लोकसंख्येच्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय ज्ञान-पुरस्कार किती, एकूण एका निकषावर विद्यापीठे उणी ठरतात आणि उलट (परदेशी)

विश्वविद्यालये भारी पडतात.

वयस्कांचा आदर करणे, प्रस्थापित मतांना आह्वाने न देणे, पुराणकथांना शब्दशः सत्य मानणे; आणि अशा साऱ्याला 'भारतीय मूल्ये' मानणे, ती न पाळणाऱ्यांना देशद्रोही, संस्कृतिद्रोही मानणे, हे सारे पीठासीनतेतून येते. जर विश्वविद्यालय हा शब्द आणि त्याच्याशी ईमान राखणारी वृत्ती जोपासली तरच हे चित्र बदलू शकते.

JNU त नेमके काय घडले हे तुकड्या-तुकड्याने बाहेर येतच आहे. आणि प्रत्येक तुकडा सत्तापीठाधीशांच्या बुद्धिमर्यादा अधिकाधिक संकुचित होत आहेत, हेच ठसवतो आहे.

1972 सालची एक घटना आठवते. ते स्वातंत्र्याचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. दलित पँथरचे राजा ढाले यांची एक मुलाखत प्रसिद्ध झाली. तिच्यात ते जे म्हणाले त्याचा मथितार्थ असा : स्वातंत्र्य मिळाल्यावर पंचवीस वर्षांनीही दलितांची स्थिती सुधारता येत नसेल, तर त्या स्वातंत्र्याला अर्थ नाही. तो राष्ट्रध्वज म्हणजे एक फडकेच ठरते.

यानंतर ढाल्यांनी एक बीभत्स सूचना केली, जी तथाकथित देशभावनेशी द्रोही ठरणे शक्य होते. पण तसा कोणताही एफायार-चार्जशीट दाखल झाला नाही. एस.एम.जोशी व वसंत बापट ढाल्यांच्या समर्थनार्थ उभे राहिले, असे आठवते. दोघांचेही म्हणणे होते, की ढाल्यांची भाषा 'असांसदीय' असेल, पण त्यांचे म्हणणे खरे आहे आणि त्यांचा संताप समजण्याजोगा आहे.

आज स्वातंत्र्याचे एकोणसत्तरावे वर्ष सुरू असतानाही ढाल्यांचा त्रागा खरा ठरेल. त्यांचा ज्या शासकीय-सामाजिक मुर्दाडपणावर राग होता, त्या सरकारचे, समाजधुरीणांचे वागणे खरे देशद्रोही आहे. पण आज ढाले सुटले नसते. त्यांना पोलिसांनी पकडले असते, कोर्टात वकिलांनी मारले असते, ती क्रिया पोलिसांनी हात बांधून पाहिली असती, आणि डझनावारी शासक-मंत्री गळा काढून "लोकभावना दुखावल्याचा नतीजा पाहा!" असे म्हणाले असते. कारण?

कारण आपण विद्यापीठे घडवतो, विश्वविद्यालये नाही!

*ट्यूलिप, शिवाजीनगर, सीमेंट रोड, नागपूर-10* * * *

# धर्म: परंपरा आणि परिवर्तन (१)

*रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ*

धर्म, मूलतत्त्ववाद, जागतिकीकरण

-----------------------------------------------------------------------

प्रत्येक धर्मात गेली अनेक शतके कट्टरपंथी वि. सुधारणावादी हा संघर्ष सुरु आहे. हा संघर्ष समजावून घेणे हे आपला भूतकाळाचा अन्वयार्थ लावण्यासाठी, वर्तमानातील कृती ठरविण्यासाठी, तसेच भविष्याचा वेध घेण्यासाठी आवश्यक आहे. हिंदू, ख्रिश्चन व मुस्लीम धर्मात ह्या संघर्षाचे स्वरूप कसकसे बदलत गेले, ह्याचा मागोवा घेणाऱ्या लेखमालेचा हा पहिला भाग

-----------------------------------------------------------------------

मानवी इतिहासात विसाव्या शतकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गेल्या अनेक शतकांपासून साठलेल्या असंख्य उच्चारित-अनुच्चारित प्रश्नांची उत्तरे ह्या शतकाने शोधली. विज्ञान-तंत्रज्ञानातील अद्भुत प्रगतीमुळे रोगराई व अभावग्रस्ततेच्या प्रश्नांची उकल होऊन मानवी आयुष्य विलक्षण सोयी-सुविधा व संपन्नता ह्यांनी गजबजून गेले. त्याचबरोबर विश्वाच्या उत्पत्तीपासून ते मानवी जीवनाच्या प्रयोजनापर्यंत मानवाला पडलेल्या असंख्य प्रश्नांची उत्तरे नवनव्या वाटांवरून शोधण्यात मानवी प्रज्ञेने धन्यता मानली. म्हणूनच ह्या काळात शोषण व विषमतेला आव्हान देणारी नवी तत्त्वज्ञाने उदयाला आली, समाजवादी व साम्यवादी राज्यव्यवस्था जन्माला आल्या व त्यासोबतच विज्ञानाचा आधार घेत नास्तिकवादापासून अद्वैतापर्यंत अनेक दर्शने नव्याने उभी राहिली. त्यापूर्वीच्या मानवी इतिहासात देव व धर्म ह्या संकल्पनांना अतिशय महत्त्व होते. परंतु युरोपमध्ये तत्पूर्वी उदयाला आलेली नवजागरण (रेनेसाँ) चळवळ आणि त्यासोबत 'बिग बँग थिअरी' व उत्क्रांतीवादासारखे शास्त्रीय सिद्धांत ह्यांमुळे ह्या

दोन्ही संकल्पनांना जोरदार हादरे बसले. विज्ञानाला विरोध करू पाहणाऱ्या चर्चला व त्याचे अधिष्ठान असणाऱ्या ख्रिस्ती धर्माला हा फटका अधिकच तीव्रतेने बसला.

ह्या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकात एकीकडे निरीश्वरवाद व निधर्मीवाद वाढीला लागले होते, तर त्याचवेळी धर्म व त्याचे मानवी विकासातील स्थान ह्यांचे महत्त्व मानणाऱ्या व्यक्ती व विचारक धर्म ह्या संकल्पनेची पुनर्मांडणी करीत होते. झपाट्याने बदलणाऱ्या जगात ईश्वर व धर्म ह्या संकल्पना कालबाह्य ठरू नयेत, उलट नव्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी मानवांना त्या साह्यभूत व्हाव्या हा त्यांचा उद्देश होता. विसाव्या शतकात ही घुसळण सर्वच धर्मांत घडताना आपल्याला दिसते. ख्रिश्चन धर्मातील चर्चच्या चिरेबंदी सत्तेला आव्हान देत अधिक मानवकेन्द्री धर्म घडविण्याच्या चळवळी ह्याच काळात उदयाला आल्या. मार्टिन ल्युथर किंगच्या नेतृत्वाखालील कृष्णवर्णीय चर्च हे त्याचे उत्तम उदाहरण होय. ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वज्ञानाचे सर्वात प्रगल्भ रूप लिबरेशन थिऑलॉजी (मुक्तीचे धर्मशास्त्र)च्या रुपात आपल्याला पाहायला मिळते. लॅटिन अमेरिकेत जन्मलेली ही चळवळ कालांतराने जगाच्या अनेक कानाकोपऱ्यात पसरली. 'येशू हा मूलतः दीनदुबळ्यांचा कैवारी होता. गरीब, दलित-शोषित पीडित ह्यांच्या बाजूने उभे राहणे, त्यांच्या मुक्तीसाठी प्रयत्न करणे हीच ईशसेवा आहे' हेच मुक्तीचे धर्मशास्त्र. असा विचार मानणारे असंख्य धर्मगुरू त्या काळात जगभरात विखुरले व अनेक माध्यमांतून त्यांनी दबलेल्या समाजघटकांना जागे करण्याचा, त्यांच्या दुःखांवर इलाज शोधण्याचा प्रयत्न केला. अर्थात जोवर ही मंडळी भूतदयावादी काम करत होती, तोवर चर्चला त्याबद्दल हरकत नव्हती. पण त्यापुढे जाऊन जेव्हा जगातील हिंसा, उपासमार, गरिबी ह्यांना कारणीभूत असणाऱ्या मूलभूत बाबींच्या विरोधात त्यांनी आवाज उठविण्यास सुरुवात केली, तेव्हा अर्थातच त्यांनी प्रस्थापित धर्मसंस्थेचा रोष ओढवून घेतला. परंतु त्याची पर्वा न करता अनेक धर्मगुरू पर्यावरणरक्षण, विनाशकारी प्रकल्पांचा विरोध, युद्धविरोध अशा प्रश्नांवर उभ्या राहिलेल्या अनेक जनआंदोलनांत सहभागी झाले, हा

(आपल्याला फारसा माहीत नसलेला) इतिहास आहे. मुस्लीम धर्मातही तुर्कस्तानच्या केमालपाशाने धर्माच्या व समाजाच्या आधुनिकीकरणासाठीं योजलेल्या उपाययोजना लक्षणीय आहेत. भारतात सरहद्द गांधी हे इस्लामच्या नव्या रूपाचे प्रतीक होते असे म्हणायला हरकत नाही.

## विसाव्या शतकातील हिंदू धर्म

ह्या सर्वांच्या तुलनेत हिंदू धर्मातील चित्र मोठे गंमतीशीर होते. एकीकडे धर्मातील पुराणमतवादी प्रवाह अजूनही खिंड लढवीत होता. जातिभेद व अस्पृश्यतेचे समर्थन मोठ्या हिरीरीने केले जात होते. स्त्रियांना शिक्षणाचा, आयुष्यातील कोणतेही निर्णय घेण्याचा अधिकार मिळाला नव्हता. भारतातील बहुसंख्य भागांत हीच स्थिती होती. बंगाल व महाराष्ट्रासारख्या ज्या राज्यांत सुधारणांचे वारे १९व्या शतकापासून घोंघावत होते, तेथे मात्र बदलांना सुरुवात झाली होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीची ही स्थिती पुढे किती बदलली हे आपल्याला सांगायला नकोच. आजही आपण समता-स्वातंत्र्य-न्यायाच्या गंतव्य स्थानापासून खूप दूर असलो तरी एका शतकाच्या कालावधीत त्या दिशेने आपण खूप लांबचा पल्ला गाठला आहे, हे निर्विवाद! हे सर्व घडविण्यात अनेक घटकांचे योगदान असल्याचे आपण मान्य करतो- उदा. तंत्रज्ञानातील बदल, आपले उर्वरित जगाशी जोडले जाणे, स्वातंत्र्यप्राप्तीचे आंदोलन व त्यानंतर स्त्रिया-दलित-शोषित ह्यांनी उभारलेल्या चळवळी इ. त्याचबरोबर हिंदू धर्मातील अनेक विचारवंत व तत्त्वज्ञ ह्यांचा त्यात मोलाचा वाटा होता हे आपण विसरून चालणार नाही. त्यांनी धर्माची व्यापक व्याख्या केली, कर्मकांड वगळून त्यातील भक्ती, प्रेम, सेवा ह्या मूल्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली, अन्य धर्मीयांबद्दल द्वेष न बाळगता सर्व धर्म शेवटी एकाच अंतिम सत्याकडे नेतात असे आग्रहाने सांगितले. ह्या सर्व घटकांनी हिंदू मानसाचे उन्नयन घडविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, विनोबा, श्री अरविंद, रवींद्रनाथ टागोर, जे कृष्णमूर्ती, साने गुरुजी ह्यांनी हिंदू परंपरेतील हीण त्यजून तीमधील ऊर्जस्वल, कालसुसंगत व शाश्वत भाग स्वीकारून हिंदू धर्म व संस्कृती ह्यांची पुनर्मांडणी

केली. त्यांनी प्रतिपादन केलेला हिंदू धर्म कोणत्याही अन्य धर्माच्या द्वेषावर आधारित नव्हता. विवेकानंद हिंदू मस्तिष्क व इस्लामी देह अशा भारतवर्षाचे स्वप्न पाहत होते. गांधींचा राम रहीमच्या हातात हात घालून वावरत होता. रवींद्रनाथ 'चित्त जेथे भयशून्य, उन्नत जेथे माथा' अशा समाजाचे स्वप्न रंगवत होते. "आज संस्कृतीरक्षणाच्या चळवळी होत आहेत. नवीन विचारांचे वारे येऊ नयेत म्हणून सनातनी नावाची मंडळी किल्ले-कोट बंधू पाहत आहेत; परंतु हे संस्कृतीरक्षक नसून संस्कृतीभक्षक आहेत. भारतीय संस्कृतीचे मढे ते कवटाळू पाहत आहेत व आतील प्राण गुदमरवत आहेत," असे म्हणणारे 'कर्ते सुधारक' साने गुरुजी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी आपल्या जीवाची बाजी लावत होते. जे कृष्णमूर्तींनी तर संघटित धर्माला पूर्णपणे नाकारून जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्रात नवे प्रश्न उभे करणे, प्रस्थापिताला आव्हान देण्याची क्षमता विकसित करणे ह्या गोष्टींसाठी आपले आयुष्य वेचले. विनोबांच्या मते "सत्यनिष्ठा उपनिषदांचा विषय आहे. करुणेचा विचार मुसलमानी धर्माचा मुख्य विचार आहे. ईश्वराला त्यात 'रहमानुर् रहीम' म्हटले आहे. ख्रिश्चन धर्मात प्रेमाचा विचार मुख्य आहे. अशा प्रकारे सगळ्या धर्मांचे सार सत्य-प्रेम-करुणेत आले आहे." गांधीनी तर *ईश्वर हेच सत्य* हा परिपाठ नाकारून *सत्य हाच ईश्वर* अशी अभिनव मांडणी केली. 'धर्म व राजकारण ह्यांना परस्परांपासून कायमचे विभक्त करायला हवे', हा पुरोगामी विचार जगभरात मान्यता पावत असण्याच्या काळात गांधी राजकारणात धर्माने दाखल व्हावे ह्यासाठी आयुष्य पणाला लावत होते; कारण त्यांच्या दृष्टीने हिंदू, मुस्लीम हे संघटित धर्म हे केवळ संप्रदाय होते. 'धर्म म्हणजे शाश्वत नीतीसूत्रे' अशी त्यांची धारणा होती. स्वतःला 'सनातनी हिंदू' म्हणवून घेत, त्यांनी हे राजकारण केले. पण त्यात साधुसंत, महंत इ. धर्माच्या ठेकेदारांना स्थान नव्हते. धर्माच्या नावावर शेकडो वर्षांपासून सुरु असणाऱ्या अनिष्ट रूढी-परंपरा ह्यांचा त्यांनी विरोध केला. एकूण असे चित्र दिसते की विसाव्या शतकात पुराणमतवादी व नवमतवादी हा संघर्ष जगातील सर्व धर्मात शिगेला पोहचला असला तरी आपला धर्म तत्त्वज्ञान व आचार (Theory and praxis) ह्या दोन्ही आघाड्यांवर कसा असावा ह्याची जी मांडणी हिंदू धर्माचे अध्वर्यू करत

होते, ती इतर धर्मांच्या तुलनेत खूपच प्रगल्भ होती. ह्याचा अर्थ हिंदू धर्मातून अंधश्रद्धा, स्त्रीदास्य व पराकोटीचा जातिभेद असे दोष नष्ट झाले होते, असा मुळीच होत नाही. पण स्त्री-शूद्र-अतिशूद्रांची परिस्थिती ह्या शतकाच्या प्रारंभी कशी होती व अवघ्या ५-६ दशकांत तिच्यात किती मोठे स्थित्यंतर घडले, ह्याचे आपण साक्षीदार आहोत. ह्या समाजघटकांच्या शोषणास धर्मशास्त्राचे पाठबळ होते, ही गोष्ट ध्यानात घेतल्यास हे परिवर्तन किती कठीण होते (व ह्यापुढेही असणार आहे) ह्याची आपल्याला कल्पना येऊ शकेल.

इतर धर्मांच्या तुलनेत आपल्या धर्मात एव्हढे परिवर्तन घडवून आणणे हिंदू धर्मातील क्रियाशील सुधारकांना शक्य झाले, ह्याची अनेक कारणे आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदू धर्माचे अस्ताव्यस्त स्वरूप. मुळात हे अनेक संप्रदायांचे कडबोळे आहे. येथे विशिष्ट दैवत, उपासनापद्धती, धार्मिक आचार-व्यवहार ह्यांना महत्त्व नाही. एकावेळी अनेक देवताना भजणारी किंवा कोणत्याही देवतेला न मानणारी व्यक्ती हिंदू असू शकते. शैव, वैष्णव, शाक्त व त्यांचे असंख्य उपपंथ आपापल्या पद्धतीने धार्मिक जीवन जगत असतात व त्याविषयी कोणी हरकत घेत नाही. हिंदू माणूस आपल्या धर्माचे पालन करताना माउंट मेरी किंवा पिराला नवस बोलू शकतो, आपला एक मुलगा शीख होईल असे ठरवू शकतो. आचार-विचारातील कमालीची लवचिकता व मोकळेपणा हीच हिंदू धर्माची निजखूण आहे असे म्हणण्यास हरकत नाही. दुसरी बाब ही की हिंदू धर्मात पुरोहीतशाही ( व तीही जन्माधिष्ठित) असली, तरी ख्रिश्चन चर्चप्रमाणे ती आपल्या अनुयायांच्या जीवनाचे नियमन करण्याएव्हढी शक्तीशाली नाही. हिंदू धर्मातही चार शंकराचार्य आहेत (त्याशिवाय स्वयंघोषित वेगळेच!) व तेही वेळोवेळी चातुर्वर्ण्य व स्त्रीदास्य ह्यांचे समर्थन काढणारी वक्तव्ये करीत असतात. पण त्यांचा प्रभाव १% हिंदू जनतेवरदेखील नाही. हिंदू धर्मातील पंथ-उपपंथ हजारो वर्षे जुने असले व त्यामुळे त्यांच्यात अनेक कालबाह्य विकृती साचल्या असल्या, तरी त्यात सुधारणेची एक परंपराही शेकडो वर्षांपासून चालत आलेली आहे. धर्माची बंधने जेव्हा असह्य होतात, कर्मकांडांना ऊत येतो, धर्मातील

सारभूत भाग विसरला जातो, तेव्हा त्या साचलेपणाविरुद्ध हिंदू धर्मात वेळोवेळी बंडे झाली आहेत व बंडखोरांनी आपले नवे दर्शन, नव्या उपासनापद्धती रुजवल्या-वाढवल्या आहेत. ह्या परंपरेचे सर्वांत महत्त्वाचे उदाहरण म्हणजे १३-१४व्या शतकात जन्मलेली व अजूनही प्रभावहीन न झालेली भक्ती-चळवळ. राजस्थानमधली मीरा, गुजराथेतला नरसी मेहता, महाराष्ट्रातले अवघे महानुभाव-वारकरी, तिथलाच पण थेट पंजाबात रुजलेला नामदेव, बंगालातले चैतन्य महाप्रभू, दक्षिणेतले बसवेश्वराचे अनुयायी ते अक्का-महादेवी .. अशी कितीतरी नावे आहेत. सूफी पंथाच्या सोबत त्यांनी काश्मीरपासून केरळपर्यंतच्या भारतात प्रेम व भक्तीवर आधारित ईशोपासनेचे नवे तत्त्वज्ञान फुलवले. ज्या तत्त्वज्ञ-सुधारकांनी विसाव्या शतकात हिंदू धर्मात अभूतपूर्व परिवर्तन घडवून आणले, त्या सर्वांची मुळे भक्ती-परंपरेत रुजली होती, हे लक्षात ठेवायला हवे.

## उलट दिशेने वाटचाल

परंतु, विवेकवादाकडे होणारी जगाची वाटचाल विसाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यावर अचानक थांबली. भांडवलशाही व साम्यवाद ह्या दोन ध्रुवांनी तोलून धरलेला पृथ्वीचा समतोल, त्यापैकी एक ध्रुव निखळल्यामुळे ढासळला. कोणालाही न जुमानणारा जगतीकारणाचा अश्वमेध वारू सारे जग पादाक्रांत करीत निघाला. नागडी भांडवलशाही, माणसाला कमालीचे आत्मकेंद्री बनविणारे तंत्रज्ञान, टोकाची विषमता ह्या सर्वांमुळे विसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकांमध्ये जगात अभूतपूर्व बदल झाले. झंझावाती परिवर्तनाची ही प्रक्रिया अजूनही सुरूच आहे. त्यामुळे मानवी नातेसंबंध मोडीत निघाले. माणूस प्रचंड एकाकी झाला व आपल्या एकाकीपणाचे उत्तरही तो कृतक-वास्तवात शोधू लागला.

*आरशातल्या आरशात झाले बेपत्ता*

अशी मानवजातीची अवस्था झाली. शेअर बाजारातून रातोरात करोडपती झालेला मध्यमवर्गीय असो की

विकास-प्रकल्पात शेतजमीन गमावून कंगाल झालेला शेतकरी, दोघांनाही कमालीच्या असुरक्षिततेने घेरले. दोघेही मग देवा-धर्मात सुरक्षितता शोधू लागले. 'रिटायरमेंट'ला आलेल्या देवाची डिमांड अचानक वाढली. इतकेच काय एकेकाळी त्याच्याकडे पाठ फिरविणारे त्याचा शोध घेऊ लागले.

देवाधर्माचा बाजार तेज झाला. देऊळ-चर्च-मशिदीतला देव बाजारात गल्ल्यावर जाऊन बसला. त्यासोबत आंतरराष्ट्रीय राजकारणातील पटदेखील बदलला. ह्या सर्व कारणांमुळे सर्व धर्मातील पुराणमतवादी वि. नवमतवादी ह्या संघर्षाने नवे रूप घेतले. मुस्लीम धर्मात अरबकेन्द्री मूलतत्त्ववादी प्रभावी ठरल्यामुळे त्यातील उदारमतवादी परंपरा क्षीण होऊ लागली आहे. विवेकानंद-गांधींचा हिंदू धर्म आसारामबापू-राधे मांच्या ताब्यात गेला आहे व विसाव्या शतकात प्रभावहीन ठरलेले त्यातील स्वयंघोषित नेते त्याच्या तालिबानीकरणाची स्वप्ने पाहू लागले आहेत. ह्याउलट ख्रिश्चन धर्मात खुद्द पोपने चर्चच्या चिरेबंदी किल्ल्याला सुरुंग लावून एका मोकळ्या, समताधिष्ठित अवकाशाचे स्वप्न जगाला दाखवले आहे. ते पाहून "हिंदू धर्माला एक पोप फ्रान्सिस मिळेल का?' असा प्रश्न खऱ्या हिंदू धर्माच्या समर्थकांना पडल्यास आश्चर्य नव्हे. ह्या स्थित्यंतराची चर्चा पुढच्या भागांत करू.

**ईमेल**: ravindrarp@gmail.com

# सुरांचा धर्म

*संजय संगवई*

भारतीय संगीतपरंपरा, सूफी, हिंदू-मुस्लीम संबंध

---

धार्मिक उन्मादाच्या आजच्या वातावरणात भारताची 'गंगा-जमनी' संस्कृती, सर्व धर्मियांचा सामायिक वारसा म्हणजे काय हे नीट उलगडून दाखविणारा हा लेख. भारतीय संगीताला मुस्लीम संगीतकारांनी व राज्यकर्त्यांनी नेमके काय योगदान दिले व सूफी परंपरेने भक्ती संप्रदायाशी नाते जोडीत कर्मठ धर्मपरंपरेविरुद्ध कसे बंड पुकारले हा इतिहास विषद करणाऱ्या लेखाचा हा पूर्वार्ध -

---

गुजरातमधल्या हिंसाचाराच्या गोंधळात एका गोष्टीकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही. बडोद्यात मुस्लिमविरोधी हिंसाचारादरम्यान उस्ताद फैयाज खानांच्या कबरीची मोडतोड झाली. अहमदाबादेत अनेक दंगे या धर्मपिसाटांनी भुईसपाट केले. त्यापूर्वी अनेक वर्षांपासून कधी गुलामअलीच्या गाण्याच्या कार्यक्रमात गोंधळ, मेंहदी हसनला कार्यक्रम करण्यापासून रोखणे असे अनेक प्रकार झाले. या सर्वांतून आपण कुठे बेसूर होत आहोत, असे सतत मनात ठुसठुसत राहते. संगीतासारख्या क्षेत्रात हे का व्हावे? भारतीय संगीताच्या क्षेत्रात या प्रवृत्ती कुठून आल्या? का आल्या?

उत्तर भारतातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व संगीतकार अनेक संस्कृतींच्या परस्पर मेळांतून घडत गेले आहेत. एकस्तरीय गायनापासून साम-गायनापर्यंतच्या प्राचीन परंपरेत देशज संगीताचा प्रभाव होताच. 'मार्ग' व 'देशी' संगीत घडत होते. दरबार सुरावटीचा किती प्रभाव राहत आला आहे त्याचा अंदाज येत नाही. मात्र कुमार गंधर्वांच्या धून उगम रागातून हा संबंध काय असावा त्याची कल्पना येते. ग्वाल्हेरचा राजा मानसिंग तोमर व मृगनैनी किंवा सोळाव्या शतकात मांडूचा सुलतान बाजबहादूर व लोकगीत गायिका रूपमती

यांच्या कहाण्या केवळ प्रेमकथा एवढ्यापुरत्याच मर्यादित नसाव्यात. दरबारी किंवा अभिजात संगीत व देशी-लोकसंगीतातील संकल्पना, स्वरावली परस्परांच्या सहवासात आल्या. संगीतातली ही खासियत आपल्या समान वारशाचे (सांझी बिरासत) एक प्रतीकच आहे.

दहाव्या शतकानंतर मुस्लिम सुलतानांच्या आक्रमणाबरोबर मोडतोड व विध्वंसाबरोबरच काही नवेही घडत जात होते. हजारो वर्षांपासून भारतीयांचा समुद्रमार्गे व्यापारानिमित्ताने अरबांशी संबंध राहत आला. पुढे मुस्लिमांनी सिंधवर आक्रमण केले. या काळात अनेक नव्या गोष्टी घडल्या. प्राचार्य कैलासचंद्र देव 'बृहस्पति' यांच्या मते एकदा थोडे स्थिर झाल्यावर मुस्लिमांमध्ये खारिजी, जिंदिकी, मुजाहिद, ख्वाजा इत्यादी संप्रदाय निर्माण झाले. हिंदू गायक, शिल्पकार, तत्त्वज्ञ इत्यादींनी अरबांना प्रभावित केले. बौद्ध भिक्षू व ब्राह्मण पंडितांकडून ते तत्त्वज्ञान, ज्योतिष, गणित, आयुर्वेद, रसायन इत्यादी विद्या शिकू लागले. इ.स. 753-774 या काळात "ब्रह्म-सिद्धान्त' "खंड-खाद्यक' अशासारख्या ग्रंथांचे अरबीत अनुवाद झाले. बगदादच्या राजाने अरबांना भारतीय विद्यांचे अध्ययन करायला परवानगी दिली. ‘बरमक’ शाखेच्या मुस्लिमांनी अनेक अरबांना विद्याध्ययनासाठी भारतात पाठवले; भारतीय विद्वानांना बगदादला बोलावून अनुवाद करून घेतले.पुढे हे ज्ञान अरबांनी युरोपीयांकडे संक्रमित केले.

त्याचबरोबर इराणी, अरबी शिल्प, संगीत व भाषेची अनेक वैशिष्ट्ये भारतात अनेक शतकांपासून येत आहेत. मौर्यकाळातल्या पाषाणशिल्पांवर -- विशेषतः अशोकस्तंभ व तत्सम -- इराणी शिल्पांचा प्रभाव होता. दहाव्या-अकराव्या शतकानंतर मुस्लिम सुल्तानांच्या स्वाऱ्यांमध्ये त्यांच्याबरोबर नंतर आलेल्या काही मुस्लिम विद्वानांनी भारतीय संगीतशास्त्र समजून घेण्याचा प्रयत्न केला. बहादूर मलिक या कडा येथील सरदाराने देशभरच्या संगीतपंडितांना बोलावून त्यांच्या ग्रंथांच्या आधारे ‘संगीत शिरोमणी’ हा ग्रंथ तयार केला. हुसेनशहा शर्की या पंडिताने अनेक नवे राग रचले. भारतीय परंपरेने त्यालाच ख्याल गायकीचा प्रवर्तक मानले. मात्र ख्याल हे शीर्षक असलेले गेय काव्य दक्षिणेतल्या सूफी लोकांत सापडते.

या काळात भारतात सूफी संत व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा, अनुयायांचा सुकाळ झाला. मुहम्मद घोरीच्या सैन्याबरोबर शेख मोईनुद्दीन चिश्ती हा सूफी भारतात अजमेर येथे स्थायिक झाला होता. मौलवी लोक सनातनी व कोरडे असत, तर सूफींनी मुस्लिम परंपरेत भक्तिसंप्रदाय आणला. ईश्वर व मनुष्य यांचे संबंध थेट व प्रेमाचे असतात; त्यात काव्य, संगीत, जनरीती व संस्कृती यांची महत्ता आहे असे सूफी मानत. संगीत हा सूफी परंपरेचा भाग राहत आला; त्यासाठी त्यांचे मौलवींबरोबर वादविवादही झाले होते. सुहरवर्दी व चिश्ती या परंपरांचे सूफी, भारतीय संगीत शिकू लागले.

मोईनुद्दीन चिश्ती व त्याच्या अनुयायांनी भारतीय भाषा व लोकरीत अंगीकारली. निजामुद्दीन चिश्ती (औलिया) काळात चिश्ती परंपरेने वसंतोत्सव साजरा करण्यास व रंग खेळण्यास सुरुवात केली. आजच्या हिंदी भाषेचा विकास या परंपरेतून झाला. फारसी व ब्रज भाषा प्रथम वेगवेगळ्या तऱ्हेने काव्यात गोवल्या जात असत. जसे -

जे हाल-ए -- मिश्किन मकुन तगाफुल
बनाएँ बतिया दुराएँ नैना।

अमीर खुसरोच्या ह्या सर्वपरिचित ओळींमध्ये फारसी व ब्रज भाषक वाक्य-समूह भिन्न आहेत. पुढे या शब्दांची परस्परांत अधिक सरमिसळ सुरू झाली. मलिक महंमद जायसी याचे कृष्णावरचे काव्य प्रसिद्ध आहे. सूफी संतांचा दरबार सर्वांना खुला असे. लोकांची भाषा स्वीकारल्याने तर ते अधिकच लोकप्रिय झाले.

ठिकठिकाणच्या सूफींनी अश्या अनेक रचना केल्या होत्या. त्यात केवळ नव्या भाषेचा विकास नव्हता; तर मुस्लिम धर्मात हिंदू दर्शनातील अनेक संकल्पना रुजत होत्या. विशेषतः व्याकुळता, भक्ती व्यक्त करण्यासाठी द्वैत (ईश्वर व माणूस) येत असतानाच इस्लाममध्ये नसलेले ईश्वर-भक्ताचे प्रेमाचे (इश्क) नाते (प्रेमी-प्रेमिका) पुढे अद्वैतात कसे परिणत होते त्याचे सुरेख प्रत्यंतर सूफी काव्यात येते. म्हणूनच सनातनी मुस्लिम मौलवी व धर्ममार्तंडांनी सूफींना धर्मबाह्य ठरवले. आता तर तबलीघसारख्या संघटना मुस्लिमांना सूफी संतांच्या दर्ग्यात जाऊ नका असे सांगतात.

सूफी तत्त्वज्ञान हे प्रस्थापित मुस्लिम संस्थात्मक धर्माच्या विरोधी-बंडखोर

होते. शेख फरीमुद्दीन गंजशकर म्हणत होते -

आसा के री यही सो रीत

जाऊ नाय की जाऊ मसीत

(मशिदीत जाऊ की न जाऊ, तू आशा लावलीस की असेच होते.)

पहिले काही सूफी भारताबाहेरून आले तरी संगीतकारांत आदरणीय रोकप्रिय सूफी संत निजामुद्दीन औलिया उत्तरप्रदेशात बदायूँमध्ये जन्मले. भारतीय दर्शनातील माया, भक्त व ईश्वराचे मैत्र या संज्ञा मुस्लिम धर्मप्रक्रियेचा सहज भाग झाल्या होत्या. सैय्यद महंमद जौनपुरी हे बुद्धिवादी सूफी म्हणतात ---

हौं बलिहारी सजना हौं बलिहार

हौं सिरजन सिहरा साजन मुझ गल हर

(साजना, तुझ्यावर मी प्राणाची कुरवंडी करते. मी सृष्टीचा मुकुट आहे --- तू माझ्या गळ्यातला हार)

शेख अब्दुल कुद्दस गंगोदी (1455-1538) यांनी अलखदास या नावाने काव्यरचना केली आहे. माया व अद्वैत इत्यादी संज्ञा एका भक्तिरसात या संतांनी सहज समाविष्ट केल्या.

जिधर देखूं हे सखी, देखूं होर न कोय

देखा बूझ विचार में सभी आपी सोय

(सखे, जिकडे पाहते तिकडे तोच. दुसरे कुणी दिसतच नाही. खूप विचार केल्यावर कळते की सगळे आपल्यातच आहेत.)

शेख बहाउद्दीन बरनावी हे सर्वसंगपरित्यागी सूफी जहांगीर बादशाहच्या काळांत संगीताचे मोठे पंडित म्हणून प्रसिद्धीस पावले. त्यांनी म्हटले आहे ---

इस नैन का यहीं बिसेख

हौं तुझ देखूं तू मुझ देख।

( या डोळ्यांचा हाच विशेष - मी तुला पाहतो, तू मला पाहा!)

सूफींनी आपल्या कल्पनाशक्तीला परंपरा व धर्मग्रंथांच्या चौकटीतून बाहेर काढताना नवे तत्त्वज्ञान घडवले. हे भक्तीचे तत्त्वज्ञान तत्कालीन नाथपंथीय व अन्य संतांच्या दर्शनाच्या जवळचेच होते. इतक्या सहजपणे भारतीय दर्शनांच्या जवळ ते आले होते की या काळात बाबा फरीद, बुल्लेशाह, नानक, नामदेव, कबीर

व अन्य कवि-संतांची व साहित्यिकांची मालिकाच दिसते. गुजरातमध्ये फेब्रुवारी-मार्च 2002 मध्ये मुस्लिमविरोधी हिंसाचारात अनेक सूफी दर्गेदेखील नष्ट करण्यात आले. शहा महंमद ज्यू जामधनी (मृत्यू 1515) या सूफीने म्हटले आहे.

एक समंदर सात कहावे, धनुस बादल मेंह बरसावे।

वही समंद हो बूंद दिखाले, नदिया नाले होकर चाले....

(समुद्र एकच; मात्र त्याला सात म्हणतात. इंद्रधनुष्य व मेघ पाऊस पाडतात. तोच समुद्र, तोच थेंब, नदी-नाले होऊन चालतात.)

सूफी परंपरेतून भारतीय मुस्लिमांची संस्कृती-त्यांची भाषा, लोकरीती, त्यांचे दर्शनदेखील अरबस्तानच्या मुस्लिमांपेक्षा फार वेगळे घडले आहे. लोकजीवनाचाच एक भाग म्हणून सूफी विचारांनी इथल्या संगीतालाही नवा आशय दिला.

मुस्लिम आक्रमणाबरोबर सूफींचा प्रवेश भारतात झाला. सूफी लोकसमूहांना बरोबर घेऊन चालणारे होते. म्हणून समाजात सहज स्वीकृत होत असत, तरी काही सूफी संतांचा अपवाद सोडला तर बहुतेकजण मुस्लिम धर्माचाही प्रचार करीत होते. मात्र त्यांची इस्लाम व धर्म यांची परिभाषा वेगळी होती. ती एक प्रकारची नैतिक बंडखोरी आहे व प्रत्येक धर्मात ती असते. भावनाशून्य व साचेबंद रूढी व दिखाऊ आचार सूफींना योग्य वाटत नाहीत. हिंदू परंपरेत वेळोवेळी बंडखोर तत्त्वचिंतक, धर्मसंस्थापक निर्माण झाले. पुरोहित व संत यांच्यात जो फरक आहे तोच मौलवी व सूफीत आहे. आचार्य कैलासचंद्र बृहस्पती हे आपल्या 'मुसलमान व भारतीय संगीत' या पुस्तकात सूफी पंथाचे अभ्यासक डॉ. अब्दुल हक यांचे एक अत्यंत लोभस अवतरण देतात,

''मौलवी बहिरंग पाहतो तर सूफी अंतरंगावर लक्ष देतो. तो कर्मकांडाचा दास होतो तर हा त्यातून मुक्त होऊ इच्छितो. मौलवीचे वागणे धिक्काराने व तिरस्काराने भरलेले असते तर याच्या वागण्यात दया व प्रेम असते. तो दुसऱ्यांचे दोष जाहीर करतो, तर हा आत्मपरीक्षण करतो. मौलवी सर्वांना एकाच तराजूत तोलतो तर सूफी प्रत्येक व्यक्तीचे वेगळेपण लक्षात घेऊन वेगवेगळा संस्कार करतो. तसे करताना 'शरीयत'ला व सर्व बाह्य आचारधर्माला सूफी धाब्यावर बसवतो. सूफी लोकांच्या अंतरंगात प्रवेश करतो, दुसऱ्याचे हृदय वश करण्याकडे

त्याचे लक्ष असते. ते करताना तो कोणत्याही धार्मिक-अधार्मिक बाह्य बाधेची फिकीर करत नाही. एक हृदय काबीज झाले म्हणजे एक नवे जग काबीज करण्यासारखे असते. त्यामुळे जे काम मोठमोठ्या पंडितांना व बादशहांना जमत नाही ते एक साधा दरवेशी व फकीर सहज करून जातो. सूफी विनयाने व नम्रतेने लीन होतो. त्याची दृष्टी परिणामावर असते, फकीराच्या दरबारात लहान-मोठा, राव-रंक, विद्वान-मूर्ख कुणीही जाऊ शकतो.''

या सूफींनी इस्लाममध्ये संगीत बसवले. कुराण व प्रेषित महंमदाच्या वचनांचा (हदीस), 'ईश्वरभक्तीत मन एकाग्र करण्यासाठी गाणे-वाजवणे सदैव योग्य आहे' - हा अर्थ त्यांनी लावला.

अनेक सूफी संत संगीत जाणत होते. कव्वाल होते. निजामुद्दीन औलिया स्वतः तसेच त्यांच्या अवतीभवती गाणारे होतेच. या चिश्ती सूफींच्या परंपरेत अमीर खुसरोचा उदय झाला. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात त्याच गोपाल नायकाबरोबर (गायक व त्याहून मोठा नायक) शास्त्रीय चर्चा झाली असल्याची शक्यता आहे. खुसरो आजच्या उत्तर प्रदेशातल्या एटा जिल्ह्यात जन्मले होते. भारती संगीत जगात सर्वश्रेष्ठ आहे असे ते म्हणत. ते ब्राह्मण पंडितांकडून थोडेबहुत भारतीय शास्त्र शिकले. त्यांनी इराणी संगीतपद्धतीतील राग-वर्गीकरणाची पद्धत भारतीय संगीतात आणली असे एक मत (बृहस्पती) आहे. मात्र आपल्याकडील डॉ. तारळेकर प्रभृतींनी त्याला विरोध दर्शविला. असो. तात्पर्य, एवढेच की भारतीय संगीताचा अधिक विस्तार व विकास सूफी परंपरेने केला. मात्र हे 'भारतीय' संगीत होते.

सूफी सामगायन, ग्राम-मूर्च्छना, मेल, थाट-राग पद्धती, प्रबंध गायकी, त्यातून मध्ययुगात धृपद गायकी प्रचलित झाली. भारतीय संगीत म्हणजे धृपद गायकीच होती हे अगदी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत खरे होते. गोपाल नायक, तानसेन, बैजू, धोंडू, हरिदास स्वामी डागर हे सर्वच धृपदिये होते. भारतीय सांस्कृतिक परंपरेत गायन-संगीत हे अभिन्न अंग होते. लोकपरंपरांमध्ये तर जन्म, मरण, विवाह, शेती, सण-वार, लेकी-सुना, धुणी-भांडी ह्या सर्व ठिकाणी गीत-संगीत असायचेच, त्यातूनच ते स्फुरायचे. अभिजात संस्कृतीतही शास्त्रीय गायनाच्या रूपाने सशक्त व सर्जनशील कला विकसित होत राहिली, या

‘मार्ग’ व ‘देशी’ परंपरांची परस्परांशी देवाण-घेवाण सतत चालूच होती. मुस्लिम सूफी संप्रदायातल्या कलाकारांनी त्याचा आणखी विकास केला. या संयुक्त प्रभावांमधून आज प्रचलित असलेल्या ख्यालगायकीची बीजे रुजली. आचार्य बृहस्पतींच्या मते खुसरो पद्धतीचा पंडित हुसेनशहा शर्की याने अनेक नवे राग रचले व ख्यालगायकीची सुरुवात केली. एका भूभागातील सतत बदलत्या, विकसित होत असलेल्या, वैविध्यपूर्ण योगदानांतून एक स्वतःचे स्वायत्त विश्व असलेले शास्त्रीय संगीताचे अंग आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग बनले. या सांगीतिक विकासाबरोबर भारतीय शास्त्रीय संगीताचे समाजशास्त्रही विलक्षण आहे.

उत्तरेबरोबर दक्षिणेतील मुस्लिम राजवटीतही भारतीय कला-विद्यांची व संगीतांची कदर झाली होती. बहामनी राज्याचा पहिला सुलतान अलाउद्दीन हसन बहादूरशहा (1347-59) हा निजामुद्दीन चिश्तीचा शिष्य व अमीर खुसरोचा मित्र होता. त्याच्या पदरी अनेक संगीतकार होते. पहिला महंमदशाह याच्या काळात भारतीय संगीतवर्गीकरणावर मुकामपद्धतीचा परिणाम झाला असे म्हणतात. मात्र बहामनी सुलतानांचे व एकंदरच मुस्लिमशासकांचे वर्तन हे धर्मांध व परकेपणासारखेही होते याचीही नोंद घ्यावयास हवी. पुढे गोवळकोंड्याचे महंमद कुली कुतुबशाह यांनी आपल्या अनेक प्रेमिकांवर काव्ये लिहिली. आदिलशाहीतील सर्व सुलतान संगीताचे चाहते होते. त्यांच्यापैकी दुसरा इब्राहीम आदिलशाह (1580-1627) यांनी ‘नवरस’ ग्रंथ संपादित केला. आपल्या गेय गीतांच्या संग्रहाचे मंगलाचरण त्यांनी सरस्वतीच्या स्तुतीने केले. ‘नवरस'मध्ये राग-रागिन्यांची शब्दचित्रे आहेत. त्यांच्या दरबारात चार हजार संगीतज्ञ होते.

(अपूर्ण)

*(साभार : उद्गार, पॉप्युलर प्रकाशन)*

# *अ पिंच ऑफ स्किन*: ती बोलते तेव्हा

*रेखा ठाकूर*

अ पिंच ऑफ स्किन, प्रिया गोस्वामी, शिश्निकाविच्छेदन

-----------------------------------------------------------------------

भारतातील एका संपन्न, सुशिक्षित समाजात कित्येक पिढ्या चालत असलेल्या एका रानटी, स्त्री-विरोधी प्रथेबद्दल असणारे मौन तोडून अस्वस्थ करणारे अनेक प्रश्न सामोरे आणणाऱ्या माहितीपटाचा एका संवेदनशील तरुण मनाने घेतलेला वेध

-----------------------------------------------------------------------

"मी सहा वर्षांची होते. अम्मी म्हणाली - तुला वाढदिवसाला बोलावलंय. मी छान कपडे घातले, केस विंचरले. अम्मीसोबत निघाले. पण जिथे गेले तिथे ना फुगे होते ना केक. मला एका अंधाऱ्या खोलीत नेलं. तिथे एक बाई होत्या. मला कपडे काढायला लावले. त्या बाईंच्या हाती ब्लेड होतं. मला काही कळायच्या आत दोन पायांमधल्या जागी त्यांनी कापलं. रक्त आलं. मी मोठ्यांनी रडले..."

ही कहाणी कोण्या एका बालउत्पीडन बळीची नाही. ही कहाणी एखाद्या इजिप्शियन – आफ्रिकन मुलीची नाही, किंवा एखाददुसरीचीही नाही. ही कहाणी आहे एका मोठ्या, तथाकथित 'सुशिक्षित' संपन्न समूहातील प्रत्येक मुलीची. आपल्याच भारतात हे घडते आहे, तेही गेल्या अनेक पिढ्या! हे धक्कादायक सत्य केवळ आपल्यापासूनच लपले आहे असे नाही, तर ही वस्तुस्थिती कदाचित त्या समूहाच्या सर्व पुरुषांनाही माहित नाही.

हे विदारक सत्य समोर आणण्याचं धार्ष्ट्य केलं 'प्रिया गोस्वामी' या तरुण चित्रपटकर्मीने आपल्या *अ पिंच ऑफ स्किन* ह्या माहितीपटातून. प्रिया ही National Institute of Design (NID) मध्ये शिकत असताना शेवटच्या सहामाहीसाठी माहितीपट करण्यासाठी विषय शोधत असताना तिच्या वाचनात 'शिश्निकाविच्छेद ' (female genital mutilation) यावरचा लेख आला. तो वाचून आणि ही गोष्ट भारतात घडते, तीही तिच्या आजूबाजूच्या समाजात, हे वाचून तिला या विषयाला वाचा फोडावे असे वाटले. त्यातून हा माहितीपट

निर्माण झाला.

या माहितीपटाचा ६० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात 'विशेष उल्लेख' करण्यात आला. हा २३ मिनिटांचा माहितीपट, कधीही न बोलल्या जाणाऱ्या, अत्यंत गुप्तता पाळलेल्या विषयाच्या आणि मुख्य म्हणजे 'परंपरा सांगते म्हणून' केल्या जाणाऱ्या विधीबाबतचा असल्यामुळे त्यात सहभागी झालेल्या महिलांच्या ओळखीविषयी विशेष गुप्तता पाळली आहे. त्यामुळे संपूर्ण चित्रपटात आपल्याला फक्त हातांच्या हालचाली, पावले, पडद्यामागे संधिप्रकाशात बोलत असणाऱ्या बाया दिसतात आणि त्यातून ऐकू येणाऱ्या, काळ्या पडद्यावर ठसठशीत इंग्रजीत छापल्या जाणाऱ्या कहाण्या मनाची सालपटे सोलत जातात.

जसजशी एकेक कहाणी पुढे सरकते, तसतशी तिच्यातील स्त्रीची असहायता, तिचा राग, तिचे प्रश्न, तिचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आणि तिचे लैंगिक अधिकार असे अनेक प्रश्न आपल्या आजूबाजूला घिरट्या घालायला लागतात. हळू हळू 'खतना" हा शब्द ओळखीचा होतो पण माहितीपटातील बायका तो शब्द अगदी सहज आणि रोजच्या वापरातला असावा इतक्या थंडपणे उच्चारतात, तेव्हा ह्या शब्दातील क्रूरता अंगावर यायला सुरुवात होते. माहितीपटातील एका वळणावर जेव्हा बायका ह्या प्रथेचे उदात्तीकरण करायला सुरुवात करतात, तेव्हा 'धर्म' ह्या संकल्पनेविषयी असणारे आपले प्रश्नही अधिक गडद होत जातात .

प्रिया गोस्वामीने पडद्यावर काळोखात विचारलेल्या ''हे सगळे कशासाठी केले जाते?'' ह्या प्रश्नावर उत्तरादाखल आलेले शब्द आपल्याला एखाद्या ब्लॅकहोलमध्ये घेऊन जातात. 'हे सगळे कसे शास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचे आहे; समाजाच्या शुद्धीकरणासाठी कसे आवश्यक आहे; नवरा बायकोचे नाते टिकवण्यासाठी असलेली ती लग्नसंस्थेची कशी निकडच आहे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बाईच्या लैंगिकतेला अंकित ठेवण्यासाठी आमच्या व्यवस्थेला आम्ही दिलेला हा विश्वास आहे', हे सगळे जेव्हा बोहरी समाजातल्या 'त्या' सुशिक्षित डॉक्टर बोलतात, तेव्हा त्यांच्या हातावरील मेहंदीचा गडद रंग आपल्याला सहन होत नाही. 'ब्लेडने छोटासा भाग कापला जातो (म्हणजे clitoris ) आणि थोडंसं रक्त येतं, बस्स. अगदी दोन मिनिटाचं काम असतं"....

पण त्या दोन मिनिटांत सात आठ वयाच्या चिमुरडीचे काय होते, तिच्या भावी आयुष्यावर त्या घटनेचा काय परिणाम होतो, तिच्या भावविश्वात काय घालमेल होते, तिच्या फुलणाऱ्या सुंदर लैंगिक भावनांचे काय होते, त्या वयातील आकर्षण, ती ओढ एका ब्लेडच्या घावाने कशी रक्तबंबाळ केली जाते.... आणि ह्या विरोधात प्रश्न विचारण्याचा अवकाशही परंपरा स्त्रीला देत नाही! बाईच्या जन्माला आलेल्या कोणीही आपली लैंगिकता व्यक्तच करू नये ही धर्मांध आणि पुरुषसत्ताक समाजरचनेची गरज आहे. पण त्यातला स्त्रियांचा सहभाग मती गुंग करून टाकणारा आहे. "माझ्या आज्जीने केलं, आईने केलं, आता माझ्या मुलीला नि सुनेलाही तेच करावं लागणार." इतके तर्कहीन उत्तर ह्या स्त्रिया द्यायला लागतात. मग ही व्यवस्था स्त्रियांना हाताशी धरून एका जीवघेण्या प्रथेतून त्या कोवळ्या जीवास मरणयातना सहन करण्यास भाग पाडते. ज्यामुळे आयुष्यभर त्या वेदना आणि पाप म्हणवून हिणवून कापून टाकलेली (हराम की बोटी) म्हणजेच तिची अपुरी लैंगिकता घेऊन, तिचा एखाद्या पुरुषावर प्रेम करण्याचा हक्कही हिरावून घेऊन तिला हे अपूर्ण आयुष्य जगायला भाग पाडते. प्रिया गोस्वामीचा माहितीपट आपल्याला कोणतीही आरडओरड न करता हे सारे सांगण्याचा प्रामाणिक व प्रभावी प्रयत्न करतो .

बाईची लैंगिकता ही नेहमीच नैतिक-अनैतिकतेच्या भोवऱ्यात फिरत ठेऊन धर्माच्या नावाखाली अश्या अघोरी प्रथांना मान्यता देणे हे जगभर पूर्वीपासून सर्रास चालू आहे. खरे तर लैंगिक भावना ह्या स्त्री आणि पुरुष दोघांकडेही निसर्गतःच आहेत . पण तरीही ती पुरुषांच्या अंकित राहावी, ती स्त्री आहे ह्याची तिला सतत जाणीव राहावी ह्यासाठी अशा प्रथा निर्माण झाल्या आणि मुख्य म्हणजे आजही त्या टिकून आहेत. कारण स्त्रियांनीच त्या मनोमन स्वीकारल्या आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीतील रीतीरिवाज आणि आचारविचार, पर्यायाने पुरुषी वर्चस्व टिकवण्यासाठी स्त्रीसारखे धारदार हत्यार दुसरे नाही, हे ह्या संस्कृतिरक्षकांना पक्के माहीत आहे.

ह्या माहितीपटाचे एक वैशिष्ट्य म्हणजे ह्यात दिग्दर्शक 'आपण हे केले पाहिजे, अशी system असली पाहिजे', असे काही दावे करत नाही. ती फक्त एक धक्कादायक सत्य आपल्यासमोर मांडते. त्यासोबत ती आपल्याला काही

आशादायी गोष्टीही दाखवते. ह्या प्रथेच्या विरोधात प्रश्न विचारणाऱ्या काही मुलींच्या आकृत्याही आपल्याला दिसतात. "हे का केले जाते? ह्या प्रथेमागे काही तर्क तरी आहे का?" – असे प्रश्न त्या विचारतात, आपला विरोध नोंदवतात, तेव्हा त्या पुसटश्या आकृत्या सकारात्मक दिसायला लागतात. "माझा माणूस म्हणून जगण्याचा हक्क ओरबाडायचा अधिकार तुम्हाला कोणी दिला आहे?" असे प्रश्न त्या आपल्या आईवडिलांना विचारतात आणि "आम्ही हे स्वीकारणार नाही" असे ठणकावूनही सांगतात.

बाई ही फक्त मुलांना जन्म देणारी, पुरुषाची लैंगिक गुलामी करणारी, आपल्या स्वत:च्या लैंगिक भावना दाबून टाकणारी अशी असावी, ही व्यवस्था खरे तर कोणत्याच जातीने, धर्माने, पंथाने स्वीकारायला नको. पण तसे होताना दिसत नाही. कारण ह्या व्यवस्थेतली स्त्री स्वतःच स्त्री असण्याच्या अपराधगंडाच्या भावनेतून 'ह्या ज्या काही प्रथा आहेत, त्या समाजाच्या कल्याणासाठी आहेत' अशी स्वतःची वेडगळ समजूत घालून जगते आहे, ते मला खूप धोक्याचे वाटते. 'माझ्यामुळे ह्या समाजात काही अनैतिक घडायला नको, ती जबाबदारी माझी आहे' हे असे स्त्रीला पटवून देण्यात हा समाज यशस्वी होताना दिसतो आणि इथेच ही व्यवस्था कोणतीही लढाई न करता जिंकताना दिसते.

पण अखेरीस कोणीही संवेदनशील स्त्री किंवा पुरुष ह्या प्रवाहात प्रिया गोस्वामीबरोबर पोहत जातो व अखेरीस 'निसर्गाने प्रत्येकाला दिलेल्या लैंगिक भावना ह्या त्या त्या व्यक्तीचा मुलभूत अधिकार आहे आणि 'खतना' सारखी अघोरी प्रथा, जी आपल्या भारतात आपल्या आसपास सुरू आहे. ती ह्या मानवी अधिकारांचे उल्लंघन करणारी आहे आणि म्हणून ती बंद झाली पाहिजे' ह्या निष्कर्षावर पोहचतो. ह्या माहितीपटातील सफरचंदाचे साल काढण्याइतकी साधी कृतीही आपल्याला अस्वस्थ करून विचार करण्यास प्रवृत्त करते आणि हेच ह्या माहितीपटाचे यश आहे.

**चलभाष:** *९८६०२६२४५२* /

**ईमेल**: thatsrekha@gmail.com

अनुभव :

# कलमा

*अमर हबीब*

आंतरधर्मीय विवाह, मानवी नातेसंबंध, कलमा

---

मुस्लीम मुलगा व ख्रिश्चन मुलगी ह्यांचा विवाह, तोही आजच्या ३५ वर्षांपूर्वी.सुनबाई तर हवीशी आहे, पण तिचा धर्म न बदलता तिला स्वीकारले, तर लोक काय म्हणतील ह्या पेचात सापडलेले सासरे व प्रेमाने माने जिंकण्यावर विश्वास असणारी सून ह्यांच्या नात्याची हृद्य कहाणी, मुलाच्या दृष्टीकोनातून --

---

आमच्या लग्नाला कोणाचा विरोध नव्हता. आशाबद्दल तक्रार नव्हती. आमचे वडील तिच्या गुणांचे कौतुक करायचे. परंतु तिने मुसलमान व्हावे एवढीच त्यांची अट होती. आम्ही एकमेकाला व्यक्ती म्हणून पसंत केले होते. धर्मांतराचा विषयच नव्हता. लग्न करण्यापासून ते मला परावृत्त करू शकत नव्हते. परंतु आशाला सून म्हणून स्वीकारायचे की नाही हे शेवटी त्यांच्याच हातात होते. धर्मांतराशिवाय स्वीकारणार नाही असे त्यांनी निर्वाणीचे सांगून टाकले. एका ख्रिश्चन मुलीला धर्मांतर करवून न घेता स्वीकारले तर लोक दूषणे देतील ही भीती होतीच. परंतु त्याहीपेक्षा त्यांच्या मनात खोलवर रुजलेले संस्कार त्यांना स्वीकारू देत नव्हते. आशाने चांगुलपणाची चिकाटी सोडली नाही. काळासोबत सगळे बदलत गेले. शेवटी संस्काराचा उपचार करून वडिलांनी स्वतःची समजूत काढून घेतली व एका सामान्य माणसाने चांगुलपणा आणि संस्कार ह्यांची अपूर्व सांगड घातली.

मग़रिबची नमाज होऊन गेली होती. दिवस मावळतीला गेलेला. सुधाकरने दिलेला मिठाईचा पुडा घेऊन मी आणि आशा आमच्या घरी गेलो. सदर बाजार

भागात आमचे जुने घर आहे. वडील अंबाजोगाईला पहिल्यांदा आले तेव्हा त्यांनी याच मोहल्ल्यात घर भाड्याने घेतले होते. कालांतराने भाडे आणखीन कमी होते म्हणून आमचे बिऱ्हाड फालोवर्स क्वार्टर्समध्ये हलले. ही सरकारी घरांची चाळ. आमचे बालपण याच चाळीत गेले. तेथे असतानाच आणीबाणीत मला अटक झाली. त्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांनी नोटीस बजावून वडिलांना घर रिकामे करायला भाग पाडले. एव्हाना ‘सदर बाजारा'त आमचे पत्र्याचे घर बांधून तयार झाले होते. आणीबाणीचा तुरुंगवास संपवून परत आलो तेव्हा पहिल्यांदा आशाची भेट याच घरात झाली होती.

आज लग्नाचे रजिस्ट्रेशन करून आम्ही परतलो होतो. मी पाटण्याहून परस्पर बीडला पोचलो. मित्राच्या खोलीवर कपडे बदलून लग्नाला हजर झालो. आशा अंबाजोगाईहून आली. तिने खास ख्रिश्चन पद्धतीची पांढरी साडी नेसली होती. तिच्या सोबत तिची बहीण व धाकटा भाऊ आणि माझी बहीण व भाऊजी होते. हे चौघे नातेवाईक सोडले तर बाकी सगळे मित्र. मी कोणालाही निमंत्रण पाठविले नव्हते. सुधाकर, बापू काळदाते आणि डॉक्टर लोहिया या तिघांना तेवढे साक्षीदार म्हणून येण्याची विनंती केली होती. या तिघांनी आंतरजातीय विवाह केलेला व आयुष्याच्या तीन टप्प्यांवर भेटलेले. कानोकानी कळत गेले आणि संघर्षवाहिनीतील कार्यकर्त्यांची व माझ्या मित्रांची गर्दी झाली. लग्नाच्या नोंदणीचा सोहळा(?) पार पडला. कोणीतरी खानसाहेब अधिकारी होते. त्यांनी माथ्यावरची रेषा हलू न देता सह्या करून घेतल्या; गुरांच्या बाजारात पंचनाम्यावर अधिकारी सह्या करतो तश्या. एकमेकाला हार घालण्याचा उपचार झाला. फोटो काढले. बापूंनी खिशातील साडेचारशे रुपये मला भेट म्हणून दिले. ते व डॉक्टर औरंगाबादला निघून गेले. आम्ही हॉटेलात राईस प्लेट जेवलो. हेच आमच्या लग्नाचे जेवण. बसमध्ये प्रचंड गर्दी होती. उभे राहूनच अख्खा प्रवास करावा लागला. लग्नाची अशी वरात. उतरताना सुधाकरने मिठाईचा डबा दिला. म्हणाला, ‘आई-वडिलांना भेटून घ्या.'

मी घरात सर्वांत धाकटा. आई-वडिलांचा लाडका. घरात घुसलो. आईचा हात धरला, माझ्या डोक्यावर ठेवला, तसाच आशाच्या डोक्यावरही ठेवला. आईला कळलेच नाही की मी काय करतोय. मी म्हणालो, ‘झाले, तुझे आशीर्वाद

आम्हाला मिळाले.’ ती काहीच बोलली नाही. नुसती आम्हा दोघांकडे बघत राहिली. आशा चांगली मुलगी आहे. ती सून म्हणून घरात घ्यायला तिची हरकत नव्हती. पण... तेवढ्यात वडील आले. आम्हाला पाहताच त्यांच्या चेहऱ्यावर कठोर भाव उमटले. मी त्यांचा असा चेहरा पूर्वी कधी पाहिला नव्हता. आम्ही दोघांनी उभे राहून त्यांना सलाम केला. वडील एकच वाक्य बोलले. ‘जब तक यह मुसलमान नहीं होती, यह तेरी बिवी नहीं कहेलाएगी.’ एवढे एक वाक्य बोलून ते निघून गेले. वीज कडाडली आणि आपल्यावरच पडली असे वाटले. या एका वाक्यात भयानक अर्थ होता. आशा रडायला लागली. तिच्या डोळ्यांतल्या अश्रूंच्या धारा काही केल्या थांबेनात. मी खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. तिच्या मनात काय चालले होते कुणास ठाऊक. ती माझेही ऐकत नव्हती. आईने पाणी आणून दिले. ते प्याली अन् बराच वेळ हुमसत राहिली.

आशा ख्रिश्चन घरातून आलेली. लहानपणी तिची आई गेली. घरातील मोठी मुलगी म्हणून तिने लहान भावंडांचा सांभाळ केला. तिचे वडील पोस्टात नोकरीला होते. मुलींच्या शिक्षणाबद्दल त्यांचा कटाक्ष होता. घरखर्चात ओढाताण सहन करून त्यांनी मुलींना शिकविले. आशाला त्यांनी नर्सिंग कोर्स करायला औरंगाबादला पाठविले. तेथे माझी बहीणही शिकत होती. या दोघींची मैत्री झाली. मी आणीबाणीच्या काळात तुरुंगात होतो. बहिणीशी माझा पत्रव्यवहार होता. माझी पत्रे आशादेखील वाचायची. एका ख्रिस्मसला तिने ग्रीटिंग पाठविले. मी आभाराचे पत्र. पुढे सिलसिला सुरू झाला. भेट होण्यापूर्वी आमची ओळख झाली होती. तिने नर्सिंग ट्रेनिंग पूर्ण केले. लगेच तिला नोकरी लागली. माझ्या बहिणीच्या लग्नात ती आली होती. एखाद्या कारभारणीला शोभेल अशा पद्धतीने तिने लग्नाची सगळी कामे हाताळली होती. आमच्या कुटुंबियांमध्ये तिचे कौतुक होते. तिचा स्वभाव सगळ्यांना आवडला होता. आम्ही लग्न करणार हेही सगळ्यांना माहीत होते. अडचण एकच होती. तिने इस्लाम धर्म स्वीकारावा अशी आमच्या घरच्यांची इच्छा होती.

एकदा विषय निघाला. तेव्हा तिने मला विचारले. मी म्हणालो, “मी तुला व्यक्ती म्हणून पाहिले, तेवढे माझ्यासाठी पुरेसे आहे.” माझ्यासाठी तिचा धर्म कोणता हा मुद्दाच नव्हता. तिने आमच्या बहिणीला सांगितले की, “तो म्हणत

असेल तर मी काहीही करायला तयार आहे. तो कोरड्या विहिरीत उडी टाक म्हणाला तरी मी टाकेन. तुम्ही त्याच्याशीच बोला.''  बरेच दिवस कोणीच विषय काढला नाही. एकदा आडून विषय निघाला. तेव्हा मी परत माझी भूमिका स्पष्ट केली. मी लग्न करण्याचा निर्णय करताना तिचा धर्म पाहिला नाही. ती व्यक्ती म्हणून मला आवडली आहे. तेवढे मला पुरेसे आहे.

वडील कर्मठ वगैरे काही नव्हते. जातीयवादी तर अजिबात नाही. आशाबद्दल त्यांना कोणतीच तक्रार नव्हती. उलट तिचे कौतुक करायचे. अडचण फक्त धर्मांतराची होती. दुसऱ्या धर्माची सून स्वीकारली तर लोक काय म्हणतील? नातेवाईक काय म्हणतील? ''वतन से दूर राहून मुलांना हेच शिकवले का?'' लोक असे प्रश्न विचारून भंडावून सोडतील अशी भीती वाटत होती. एका सामान्य माणसाला अस्वस्थ करायला एवढे प्रश्न पुष्कळ झाले. आंतरधर्मीय विवाह ही कल्पनाच नवी, धक्कादायक. आपल्या घराण्यात पिढ्यान् पिढ्या कोणी असे पाऊल उचलले नाही. ते चांगले की वाईट याची चर्चा नको. आज ते आपल्या घरात पडता कामा नये. वडिलांचा सरळसोट आणि सरधोपट विचार. 'मुलीच्या पसंतीबद्दल आम्ही हरकत घेतली नाही. आता धर्मांतराबद्दल आमचे ऐकावे' असा त्यांचा हेका होता.

मला नातेवाईक अथवा लोकांशी काही देणेघेणे नव्हते. ते काय म्हणतात याची मला चिंता नव्हती. मी लग्न करणार आहे. आम्ही दोघे सोबत आयुष्य काढणार आहोत. आमचे आम्ही ठरवू. आमच्या लग्नाशी लोकांना काय देणेघेणे? आम्ही कोणाला विचारले का की, ते असे का करतात? मग आम्हाला विचारण्याचा त्यांना काय अधिकार? आम्ही लोकांना अडविले नाही. लोकांनी आम्हाला अडवू नये. मी असा सगळा विचार करू शकत होतो. वडिलांना ते शक्य नव्हते. त्यांचे बालपणापासूनचे संस्कार कसोटीला लागले होते.

लग्नाचा आशीर्वाद मागण्यासाठी आलेल्या लाडक्या मुलाच्या आणि सुस्वभावी सुनेच्या डोक्यावर हात ठेवण्याऐवजी त्यांनी  एक भयानक वाक्य वापरून आम्हाला ठोकरून लावले. ते वाक्य माझ्या जिव्हारी लागले. थोडेबहुत सामाजिक आकलन झाल्यामुळे ते मी पचवू शकलो. मात्र आशाच्या चिमुकल्या भावविश्वाच्या चिंधड्या-चिंधड्या झाल्या.

**दोन** -

आशाला मेडिकल कॉलेज परिसरात क्वार्टर मिळाले होते. आमचा नवा संसार याच घरात सुरू झाला. त्या काळी मी सतत फिरतीवर असायचो. आशा इथेच राहायची. त्यात तिचा स्वभाव कुटुंबवत्सल. तिला सासू, सासरे, नणंदा, भावजया, भाऊ, बहिणी असा गोतावळा हवासा वाटायचा. आपले घरदार सोडून ती आलेली. तिला वाटले येथे नवा गोतावळा मिळेल. परंतु येथे वेगळेच. नवऱ्याशिवाय दुसरा नातेवाईक नाही. तोही वाऱ्यावर. कधी येथे, कधी तेथे. आधाराला म्हणून माझे मित्र, माझी बहीण, तिच्या नव्याने झालेल्या मैत्रिणी. परंतु तोही हवा असलेला गोतावळा मिळत नव्हता. कारण साधे होते. तिने धर्मांतर केले नव्हते.

ड्यूटी संपली की आशा 'सदर बाजारा'तील आमच्या घरी येऊन बसायची. बसून राहायची. आमच्या घरचे लोक तिला हाकलून लावण्याएवढे उद्धट नव्हते. ती तासन् तास बसून राहायची. तिच्याशी कोणी बोलत नसे. जो-तो आपापल्या कामात. ते एकमेकांशी बोलायचे. पण हिच्याशी कोणीच नाही. चार-चार तास ती बसून राहायची. दिवस मावळताना क्वार्टरला परतायची. काही महिन्यांत अबोला तुटला. हळूहळू आई बोलू लागली. ही तिच्या कामात मदत करू लागली. घरात जागा मिळाली. पण मनाची दारे बंदच होती.

आशाची आई लहानपणीच गेलेली. वडील पोस्टात नोकरी करीत होते. ते धार्मिक कार्यक्रमात उत्साहाने भाग घ्यायचे. नगर जिल्ह्यात ख्रिश्चनांची सं"या बऱ्यापैकी आहे. तिच्या माहेरीदेखील लग्नाचे कौतुक झाले नाही. एका मुसलमानाशी तिने लग्न केल्याची अढी होतीच. त्यात मी नोकरी करीत नाही. कार्यकर्ता आहे. आशा वेडी आहे. भोळी आहे. ती बिचारी फसली. अशी भावना. एक गोष्ट खरी की, आशाच्या माहेरच्या लोकांनी माझे कौतुक केले नसले तरी, मला अपमानितही केले नाही. माझ्या दृष्टीने एवढे पुरेसे होते. परंतु आशाला तेवढे पुरेसे वाटत नसे.

आपल्याकडे पहिल्या बाळंतपणाला मुलगी माहेरी जाते. आशा कोठे जाणार? आई नाही. जे कोणी माहेरचे लोक आहेत त्यांची परिस्थिती बाळंतपण

पेलणारी नाही. शेवटी अंबाजोगाईलाच बाळंतपण करायचे ठरले. मी माझे पंख दुमडून घेतले. आशासोबत राहायेच ठरविले. घरात आम्ही दोघे. दोघे नवखे. बाळंतपणाची तयारी दोघांनी मिळून केली. या काळात मी जेवढे शिकलो तेवढे कोणत्याही पुस्तकातून मला शिकता आले नाही.

आशाला दवाखान्यात नेण्यात आले. तिच्याजवळ माझी बहीण आणि तिची एक मैत्रीण होती. मी वॉर्डाच्या बाहेर अस्वस्थ उभा. उत्तररात्री मुलगी झाल्याचे मला सांगण्यात आले. पळत जाऊन शिरा करून घेऊन आलो. तासभरानंतर आशाची माझी भेट झाली.

दोन-तीन दिवसांनंतर आशा घरी आली. एके दिवशी मी बाहेरून घरी आलो. तेव्हा आशाने मला सांगितले, "आज अब्बाजान (माझे वडील) इथे आले होते. त्यांनी मुलीच्या कानात 'अज़ान' म्हटली. थांबले नाहीत. लगेच निघून गेले.''  आशाने धर्मांतर केले नाही म्हणून वडिलांनी तिला सून म्हणून स्वीकारले नाही. परंतु तिच्या लेकराच्या कानात 'अज़ान' मात्र म्हटली. हा काय प्रकार आहे? वडिलांशी चर्चा करण्याची सोय नव्हती. माझा मीच उलगडा करून म्हणालो. ''ही मुलगी आपल्या मुलाची आहे. आजोबा म्हणून तिच्या कानात 'अज़ान' म्हणणे आपले धर्मकर्तव्य आहे असे त्यांना वाटले असावे.'' वडील निःसंकोचपणे आमच्या घरी आले. अज़ान म्हणून निघून गेले. आपण हे केल्याचे माझ्या आईलादेखील त्यांनी सांगितले नसावे. हा दिखाव्याचा भाग नव्हता. एका सामान्य माणसाच्या धार्मिक आस्थांची ती अभिव्यक्ती होती. चांगुलपणा आणि आस्थांची सरमिसळ.

**तीन** -

त्यांचे वय झाले होते. पूर्वीसारखे काम करता येत नव्हते. जो माणूस सायकलीवर तीस-तीस किलोमीटर रोज प्रवास करायचा, या गावाहून त्या गावाला पायी जाण्यात ज्याने कधीच कुचराई केली नाही, तो माणूस आता हिंडू-फिरू शकत नव्हता. आपले गाव सोडले, आपला प्रदेश सोडला. जिथली भाषा आपल्याला बोलता येत नाही, कळतही नाही, अशा प्रदेशात येऊन ज्याने आपली मुले वाढविली, शिकवली. मोठी केली, तो माणूस आज पलंगावर पडून होता.

भाऊ पैसे पाठवायचा. त्यावर घर चालायचे. वडिलांना ही स्थिती मान्य होणारी नव्हती. वयाबरोबर अनेक रोगांनी त्यांना घेरले. एक-दोनदा ऑपरेशन झाले. यंदा मात्र मोठी बिकट स्थिती होती.

वडिलांना वॉर्डात दाखल केले होते. मोठे ऑपरेशन झाले. डॉक्टर निर्वाणीचं बोलत होते. परंतु प्रयत्नांची शिकस्तही करीत होते. बावीस दिवस झाले. वडील मृत्यूशी झुंज देत होते. माझी बहीण आणि आशा साईडरूममध्ये एका पलंगावर पडून असलेल्या माझ्या वडिलांची अव्याहत सेवा करीत होत्या. आमच्या आईला दिसत नव्हते म्हणून ती तगमग करीत घरीच थांबली होती. माझे भाऊजी माझ्यासोबत असायचे. मी खडा पहारा देत होतो. बाहेरची धावपळ करीत होतो. वडिलांची स्थिती मला पाहवत नव्हती. साईडरूमच्या आत जाऊन त्यांची स्थिती पाहण्याचे धाडस माझ्यात उरले नव्हते. आशा मात्र निरागसपणे सेवाशुश्रूषा करीत होती. वडील आज जाणार की उद्या अशी अवस्था होती. आशाशिवाय त्यांना सेवेला कोणी चालत नव्हते. "आशा, पाय उचलून तिकडे ठेव. आशा, ह्या हाताला मुंग्या आल्या. आशा हे कर. आशा ते कर." ती पलंगाच्या बाजूला बसून जेवत असली तरी तिलाच हाक मारायचे. घास बाजूला ठेवून ती तशीच उठायची. शेवटी तीन दिवस तर आशाला झोप कशी ते माहीत नव्हते.

मला राहवले नाही म्हणून मी तिला विचारले, "काय होणार आहे हे तुला चांगले समजत असताना तू त्यांची एवढी सेवा का करते आहेस?"

याला एवढे साधे कसे समजत नाही असा कटाक्ष तिने माझ्यावर टाकला. ती म्हणाली, "ईश्वराने हे सुंदर विश्व निर्माण केले. त्यात एक माणूस आणखीन काही काळ राहावा. यासाठी आपण धडपड केली पाहिजे." तिचे ख्रिश्चन संस्कार बोलले की तिच्या परिचर्येची प्रेरणा की सहज माणूसपण? मी तिच्याकडे नुसता पाहत राहिलो.

वडील गेले त्याच्या तीन दिवस आधीची घटना आहे. वडिलांनी आशाला हाक मारली. आशा पुढे आली. वडील म्हणाले, "मी म्हणतो तसे माझ्या मागे म्हण", आशाने मानेने होकार दिला.

वडील म्हणाले, "लाइलाहा"

आशा म्हणाली, "लाइलाहा"

वडील म्हणाले, "इल्ल लाहु"

आशा म्हणाली, "इल्ल लाहु"

वडील म्हणाले, "मुहम्मदन रसुलल्हा"

आशा म्हणाली, "मुहम्मदन रसुलल्हा"

एवढे होताच वडिलांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. छातीवर ठेवलेला भला मोठा दगड बाजूला व्हावा असे त्यांना वाटले. वर्षानुवर्षे तुंबलेला पाण्याचा प्रवाह खळखळा वाहू लागाला. त्यांच्या डोळ्यांत एक विलक्षण चमक उमटली. ते एवढेच म्हणाले, "अब मैं इत्मेनान के साथ मर सकता हूँ." आणि त्यांनी डोळे मिटून घेतले.

आशाने मला हा सगळा प्रकार सांगितला. "असे म्हटल्याने काय होते रे?" तिने विचारले. "हा कलमा आहे. इस्लामची मूळ श्रद्धा. ईश्वर एक आहे. त्याशिवाय दुसरा कोणी पूजनीय नाही आणि महंमद हा ईश्वराने पाठविलेला पैगंबर आहे. 'कलमा' पढवून मुसलमान केले जाते. ही मुसलमान करण्याची पद्धत आहे. हा एक उपचार आहे."

मी गमतीने म्हणालो, "तू 'कलमा' पढलास. आता तू मुसलमान झालीस." त्यावर ती पटकन म्हणाली, "इतकेच होते तर आपण आधीच का मुसलमान झालो नाही?"

तीन दिवसानंतर वडिलांनी कायमचे डोळे मिटले. लग्नानंतर आशीर्वाद मागायला गेलो होतो तेव्हाच्या कठोर भावांचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर नव्हता. खूप काम करून थकलेल्या माणसाला गाढ झोप लागल्यावर जसा दिसतो तसा त्यांचा चेहरा दिसत होता.

**चलभाष** : ९४२२९३१९८६

**पूर्वप्रसिद्धी :** कलमा, परिसर प्रकाशन, अंबाजोगाई

# दुखऱ्या मूळांपर्यंत

*द भा धामणस्कर*

सकाळ झालीय
फुलझाडांच्या झुंजूमुंजू उजेडात एक
हिंस्त्र जनावर काठीने
फुलांवर हल्ले करीत आहे.

बघता बघता
सगळ्या झाडांचे विविध आविष्कार
परडीत जमा होतील आणि
जनावर देवपूजेला बसेल तेव्हा
इथल्या झाडांना
फुलेच येत नाहीत अशी वदंता
झाडांच्या
दुखऱ्या मूळांपर्यंत पोहचली असेल
***

*अकल्पित, गजबंधन सोसायटी*
*सी के पी हॉलसमोर, राम गणेश गडकरी पथ,*
*डोंबिवली (पू.), ४२१२०१*

**पूर्वप्रसिद्धी**: *बरेच काहीं उगवून आलेले,* मौज प्रकाशन